


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष ११ ■ अंक २९८ ■ गुरुवार, दि. ४ मे २०२३ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2021-2023

## आठ कोटींचा निधी पुरवठा विभागाकडे पडून

**शेतकरी एपीएल कार्डधारकांची योजना थंडबस्त्यात**

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत एपीएल शेतकरी लाभार्थींना धान्याऐवजी दर महिन्याला प्रत्येकी १५० रुपये देण्याचा निर्णय शासनामार्फत गेल्या मार्चमध्ये घेण्यात आला; मात्र जिल्ह्यातील तहसील कार्यालयांकडून लाभार्थी शेतकऱ्यांनी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाला अद्याप प्राप्त झाली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील एपीएल रेशनकार्डधारक ३९ हजार ४३९ शेतकरी कुटुंबातील १ लाख ९२ हजार ३७५ लाभार्थींच्या खात्यात १५० रुपयांची रक्कम जमा होणे अद्याप बाकी आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंबातील रेशन कार्डधारक लाभार्थींसह एपीएल केशरी रेशन कार्डधारक शेतकरी लाभार्थींना दरमहारेशन दुकानांमधून सवलतीच्या दरात अन्नधान्याचे वितरण करण्यात येत होते. त्यामध्ये गेल्या जानेवारी २०२३ पासून अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंबातील रेशन कार्डधारक लाभार्थींना दरमहा मोफत अन्नधान्याचे वितरण करण्यात येत असून, एपीएल केशरी रेशन कार्डधारक शेतकरी लाभार्थींना गेल्या सहा महिन्यांपासून रेशन दुकानांमधून मिळणाऱ्या अन्नधान्याचा लाभ बंद करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर एपीएल लाभार्थींना धान्याऐवजी प्रतिमहा प्रतिव्यक्ती १५० रुपये देण्याचा निर्णय शासनाने गत मार्च महिन्याच्या प्रारंभी घेतला. त्यानुसार जानेवारी २०२३ पासून दरमहा प्रत्येकी १५० रुपये अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा करावयाची आहे, शासनाकडून गत महिन्यात जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाला आठ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला; परंतु दोन महिन्यांचा कालावधी नंतरही प्रक्रियेला सुरुवात झाली नाही. यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी बि. यु. काळे यांनी शेतकऱ्यांना आपले बँक खाते व इतर कागदपत्रे आपल्या रास्त भाव दुकान जवळ जमा करण्याचे आवाहन केले आहे. जेणेकरून एपीएल शेतकरी लाभार्थींची माहिती तहसील कार्यालयांकडून प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यातील एपीएल शेतकरी कुटुंबातील लाभार्थींच्या खात्यात दरमहा १५० रुपयांची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया लवकर सुरु करण्यात येईल असेही त्यांनी कळविले आहे.

**IMP UPDATE**

### उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मणिपूरमध्ये हिंसाचार!

**नवी दिल्ली:** मणिपूर उच्च न्यायालयाच्या राज्यात तणाव निर्माण झाला आहे. राज्यातील परिस्थिती पाहता लष्कर तैनात करण्यात आले. मणिपूर नागरी प्रशासनाच्या आवाहनावरून लष्कराला विविध भागात तैनात करण्यात आल्याची माहिती लष्कराने दिली आहे. ३ मे संध्याकाळपासून ही तैनाती करण्यात आली आहे. लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. बुधवारी विविध विद्यार्थी संघटनांनी मणिपूरमधील सर्व १० जिल्ह्यांमध्ये ऑल ट्रायबल स्टुडंट्स युनियनच्या बॅनरखाली मोर्चे काढले, ज्यामध्ये मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. मेईतेई समाजाला जमातीचा दर्जा देण्यास आंदोलकांचा विरोध आहे.

### आयकर विभागाचे पुण्यातील बांधकाम व्यावसायिकांवर धाडसत्र

**पुणे:** गेल्या काही दिवसापासून राज्यात अनेक ठिकाणी आयकर विभागाने छापेमारी करून मोठ्या कारवाया केल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच नाशिकमधील पंधराहून अधिक बांधकाम व्यावसायिकांच्या घरी छापेमारी केली होती. कर चुकवेगिरी करणाऱ्या या बांधकाम व्यावसायिकांच्या घरी छापेमारी झाल्यानं एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, आता पुणे शहरातही आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून छापेमारी करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील अनेक बांधकाम व्यावसायिक हे आयकर विभागाच्या रडारवर आहेत. आज सकाळी आयकर विभागाकडून ही कारवाई सुरू झाली आहे. पुणे येथील अधिकाऱ्यांचे पथक ही कारवाई करत आहे. सकाळपासून आयकर विभागाचे अधिकारी बांधकाम व्यावसायिकांच्या घरी पोहोचले आहेत.

### शरद पवारांचे कमबॅक की...

# सुप्रिया सुळे राष्ट्रवादीच्या नव्या अध्यक्ष?

## शरद पवारांना मी दिलेला सल्ला मान्य होईल का – उध्दव ठाकरे

प्रतिनिधी ४ मे

**मुंबई :** देशामध्ये आजघडीला सर्वाधिक राजकीय घडामोडी घडत असतील त्या महाराष्ट्रातच. शिवसेनेतील बंडाला एक वर्ष होत नाही, तोच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद सोडण्याची घोषणा करून शरद पवारांनी सर्वांनाच धक्का दिला. आता राष्ट्रवादीचा नवा अध्यक्ष कोण, याची चर्चा सुरू झाली आहे. पक्ष कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करून शरद पवारच कमबॅक करणार की, आपली



कन्या खासदार सुप्रिया सुळे यांना संधी देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भाकरी फिरवण्याची वेळ आली. याबाबत विलंब करून चालणार नाही; भाकरी फिरवली नाही तर ती करपते, असे वक्तव्य शरद पवार यांनी एप्रिल महिन्याच्या अखेरीस केले होते. मुंबई विभागीय राष्ट्रवादी युवक काँग्रेसतर्फे आयोजित युवा मंथन कार्यक्रमात त्यांनी हे संकेत दिले होते. त्यानंतर मुंबईतील यशवंतराव चव्हाण ➢ पान २ वर

### अजित पवारांकडे अध्यक्षपद नको - शालिनीताई पाटील

**नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस ज्येष्ठ नेते शरद पवार अध्यक्षपद सोडल्यानंतर नवा अध्यक्ष कोण? अशी चर्चा पूर्ण देशात सुरू आहे. पक्षातील नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी आणि विरोधी पक्षांनी आपली पसंती अजित पवार, सुप्रिया सुळे आणि जयंत पाटील यांना दर्शविल्यामुळे अजूनच चर्चा होत आहे. अशावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी आमदार शालिनीताई पाटील यांनी अजित पवारांवर गंभीर आरोप करत त्यांना नापंसती दर्शविली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे आत्मचरित्र असलेल्या 'लोक माझे सांगाती' या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात शरद पवार यांनी सर्वांना धक्का देत राजकीय निवृत्तीची घोषणा केली. शरद पवार यांच्या निर्णयावर बोलताना शालिनीताई म्हणाल्या की, ते माझ्यापेक्षा १० वर्षांनी ➢ पान २ वर

### सामनाच्या अग्रलेखातून आग लावणे सुरू

**मुंबई:** नितेश राणे यांनी सध्या ठाकरे गट आणि ठाकरे कुटुंबावर आसूड ओढण्याचे काम सुरू केले आहे. संजय राऊत यांची पत्रकार परिषद झाल्यानंतर नितेश राणे हे त्यांच्या पत्रकार परिषदेला उत्तर देत आहेत. राज्याच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून अनेक घडामोडी घडत आहेत. संजय राऊत ठाकरे गटाचे खासदार असले तरी ते शरद पवार यांच्या जवळ आहेत. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या भेटी घडवून देण्याचे काम संजय राऊत चोख पद्धतीने करत आहेत. पण संजय राऊत हे पवार कुटुंबियात आग लावण्याचे काम करत आहेत, असा घणाघात नितेश राणे यांच्याकडून करण्यात आला आहे. ➢ पान २ वर

# जैन सन्स, सांगलीवाला समोर अवैध पार्किंग

## रस्त्यावर वाहतुकीस रोज होतो अडथळा





प्रतिनिधी ४ मे


**अकोला:** बाजारपेठेतील सांगलीवाला व जैन सन्न या समोर रोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वाहनांची पार्किंग असते. ती त्वरीत बंद करण्यात यावी. त्याच बरोबर या ठिकाणचा रस्ता मोकळा करण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे. बाजारपेठेतील सांगलीवाला आणि जैन सन्स यांचे पार्किंग ने संपुर्ण रस्त्यावर वाहनांचा जॅम होतो. त्यामुळे सामान्य नागरिकांची मोठी अडचण होत आहे. वर्षा मेडिकल समोर असलेली डिपी तत्काळ हटविण्याची गरज आहे. अतिशय वर्दळीच्या भागात संपुर्ण रस्ता या डिपीमुळे अडविण्यात आला आहे. त्या ठिकाणी अवैध पार्किंग केल्या जाते. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना रोज बसत आहे. विशेष म्हणजे शहर वाहतुक शाखेच्या पोलिसांच्या आशिर्वादाने येथे अवैध पार्किंग असून त्याचा फटका रोज सायंकाळी रस्त्यावरील नागरिकांना बसत आहे. महापालिका पार्किंग नसताना अशा प्रकारे बड्या शो रुम ला परवानगी कशी काय देते अशी विचारणा आता होत आहे. शहरातील बड्या शोरुमची पार्किंग समस्या पाहता रस्त्यावरील अपघातास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होतो. महापालिका प्रशासकांची गाडी याच मार्गाने जात असताना त्यांचे देखील दूर्लक्ष का अशी विचारणा स्थानिक नागरिक करत आहे.

# भारतीय जनता पार्टीचे प्रदेश पदाधिकारी घोषित

- माजी मंत्री अनंतराव देशमुख विशेष निमंत्रित सदस्य
- उपाध्यक्ष चैनसुख संचेती, सरचिटणीस आ. रणधीर सावरकर

प्रतिनिधी ४ मे





**अकोला:** भारतीय जनता पार्टीच्या नूतन प्रदेश पदाधिकाऱ्यांची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी मुंबईत पत्रकार परिषदेत केली. नवीन प्रदेश कार्यकारिणीत १६ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १६ चिटणीस, ६४ कार्यकारिणी सदस्य, २६४ विशेष निमंत्रित सदस्य आणि ५१२ निमंत्रित सदस्यांचा समावेश आहे.

मलकापूरचे चैनसुख संचेती हे उपाध्यक्ष पदावर नियुक्त झाले आहे. तर भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीत अकोल्याचे जिल्हाध्यक्ष व आमदार रणधीर सावरकर यांची प्रदेश सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश कार्यकारणी सदस्यांमध्ये डॉ.रणजीत पाटील, तेजराव थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष निमंत्रित सदस्यांमध्ये माजी मंत्री अनंतराव देशमुख, माजी आमदार नारायण गव्हाणकर, ॲड.मोतीसिंह मोहता, डॉ.अशोक ओळंबे, किशोर मांगटे पाटील, मधुकर कांबळे, बळीराम शिरस्कार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्येष्ठ आमदार गोवर्धन शर्मा, प्रकाश भारसाकळे, ➢ पान २ वर







# नाफेडचे नियम व निकष शेतकऱ्यांच्या जिवावर!

- हरभरा खरेदी अद्याप सुरु नसल्याचा आरोप
- राज्य शासनाचे दूर्लक्ष; शेतकरी त्रस्त

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** नाफेडने मधातच हरभरा खरेदी बंद केल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यात आता पुन्हा खरेदी सुरु केली तर अनेक अटी लादण्यात येत असल्याने शेतकरी चांगलाच वैतागला आहे.

अकोला जिल्ह्यात ९० हजार




क्विंटल च्या वर अतिरिक्त हरभरा खरेदी करण्याचे परिपत्रक गेल्या काही दिवस आधीच जिल्हा पणन अधिकारी यांना प्राप्त झाले मात्र या वेळी लावण्यात आलेले नियम व निकष ➢ पान २ वर

### कोण होणार अकोल्याची....

# 'पिक बे अकोला केक क्वीन २०२३'

प्रतिनिधी ४ मे

**कोण ठरेलं पैठणीची मानकरी**

**अकोला:** पाककलेत महिलांची निपुणता असतेच, पण या कलेच्या माध्यमातून अनेकविध प्रयोग करताना विविध खाद्यपदार्थ तयार करण्याचा प्रयत्न काही जणी करतात. त्यांच्या अशा प्रयत्नांना प्रोत्साहन मिळावे या साठी विविध पाक कला स्पर्धेचे आयोजन केले जाते.परंतु अकोल्यात पहिल्यांदा आर आर सी नेटवर्क व सिटी मैत्रीण यांच्या संयुक्त विद्यमाने कोण होणार अकोल्याची 'पिक बे अकोला केक क्वीन' या स्पर्धेचे आयोजन् केले आहे महिलांमधील असलेल्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महिला, युवती, तरुणी यांच्यातील उपजत गुणांना वाव देण्यासाठी या केक स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आर आर सी नेटवर्क व सिटी मैत्रिण च्या संचालिका सौ.कल्पना देशमुख व सौ.ऋतुजा देशमुख यांनी दिली. या स्पर्धेत अकोलेकर महिलांनी जास्तीत जास्त संख्येत सहभागी होत पैठणीसह इतर बक्षीस जिंकण्याची संधी निर्माण झाली आहे. ➢ पान २ वर

# कॉल्थ मार्केटमध्ये सोयींचा अभाव

## ना अग्निशमन यंत्रणा ना पार्किंगची सोय

प्रतिनिधी ४ मे



**अकोला :** अकोला महापालिकेच्या दूर्लक्षामुळे क्लॉथ मार्केट हे समस्यांचे माहेरघर झाले आहे. येथे रोज हजारो ग्राहकांची ये जा असते. या ठिकाणी कुठे ही पार्किंग नाही, रस्त्यावर दुकानदारांनी थेट माल ठेवल्याचे चित्र आहे. तर एखादी अप्रिय घटना घडली तर रामद्वार, कृष्णद्वार येथून अग्निशमन दलाची गाडी देखील आत जाऊ शकत नाही.

कोट्यावधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या क्लॉथ मार्केट मध्ये अव्यवस्था आहे. सगळीकडे अग्निशमन यंत्रणेची सक्ती महापालिका करते. पण, क्लॉथ मार्केट मध्ये अग्निशमन यंत्रणा नाही. इतके काय तर साधे पाण्याची टाकी देखिल नाही. दूकानदाराच्या सोयीसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था नाही. दूकानासमोर सर्रास दूकानातील माल ठेवत काही दूकानदारांची दादागिरी सुरु असल्याचे चित्र आहे. प्रत्येक दूकानात अग्निशमन यंत्रणा आवश्यक असून बाजारपेठेतील दोन्ही रस्ते हे खुले असावे असा नियम आहे. पण, सर्व नियम क्लॉथ मार्केट मध्ये धाब्यावर बसविल्याचे चित्र आहे. महापालिका संपुर्ण गावातील ➢ पान २ वर




CMYK CMYK

# राष्ट्रीय लोक अदालत मध्ये २०७३ प्रकरणांचा निपटारा

## ७,०९,७०,६०७ रुपयांचा दंड वसूल

प्रतिनिधी ४ मे

**अकोट:** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला यांचे आदेशावरून तालुका विधी सेवा समिती व विधीज्ञ मंडळ, अकोट यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन न्यायमंदीर अकोट येथे करण्यात आले होते.

या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये एकुण २०७३ प्रकरणांचा निपटारा करत ७,०९,७०,६०७/- चा दंड वसुल करण्यात आला.

आला.राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एकुण दोन पॅनल गठीत करण्यात आले होते. पॅनल क्रमांक १ वर पॅनल प्रमुख म्हणुन चकोर श्रीकृष्ण बाविस्कर, जिल्हा न्यायाधीश - १ तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती, अकोट तर पंच म्हणुन अ‍ॅड. श्री विकी मंढरे हे होते.

पॅनल क्रमांक २ वर पॅनल प्रमुख म्हणुन भानुप्रताप बि. चौहान, सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोट तर पंच म्हणुन अ‍ॅड. देवानंद फुसे, हे होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी न्यायालयीन कर्मचारी,प्रशांत शेंडे (जि. न्या.कार्या.अधीक्षक), विजय जितकर, समाजसेवक तसेच अकोट शहर/ग्रामीण, दहिहांडा, हिवरखेड आणि तेल्हारा पोलीस स्टेशचे कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# सुदानमध्ये अडकलेले महाराष्ट्रातील चौतीस नागरिक मायभूमित दाखल

**नवी दिल्ली :** सुदानमधील गृहयुद्धात अडकून पडलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयातर्फे ‘ऑपरेशन कावेरी’ सुरू करण्यात आले आहे. या मोहिमे अंतर्गत रात्री १२.०० वाजता दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर लष्कराच्या विशेष विमानाने ३२८ भारतीय नागरिकांची २०वी तुकडी भारतात परतली. यात महाराष्ट्रातील ३४ नागरिकांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दिल्लीस्थित महाराष्ट्र सदनाद्वारे स्थापन सहकार्य कक्षाच्या माध्यमातून सुदान येथुन परत आणलेल्या नागरिकांना सुखरूप स्वगृही पाठविण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र सदनाचे प्रभारी निवासी आयुक्त श्रीमती नीवा जैन यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर महाराष्ट्र सदनाचा सहकार्य कक्ष सुरु करण्यात आले आहे. सदनाच्या अपर निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार या कक्षाच्या पर्यवेक्षणाची आणि केंद्र शासनासोबत समन्वयाची जबाबदारी पार पाडत आहेत.

## पान १ वरून ...

### शरद पवारांचे कमबॅक की...

सभागृहात ‘लोक माझे सांगाती’ या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद सोडण्याची घोषणा केली. अपेक्षेप्रमाणे राष्ट्रवादीचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पद न सोडण्याची गळ घातली. काही जणांचे अश्रू अनावर झाले, गहिवरून आले. दरम्यानच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार हे भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा होती. राष्ट्रवादीतील एक गट त्यांच्याबरोबर असल्याचेही सांगितले जात होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मुखपत्र असलेल्या ‘सामना’ या दैनिकातील आजच्या (गुरुवार) अग्रलेखात त्यावरच बोट ठेवले आहे. पवारांच्या चरणाशी लोळण घेणाऱ्यांपैकी अनेकांचा एक पाय भाजपात आहे. अजित पवार व त्यांचा गट वेगळी भूमिका घेण्याच्या तयारीत असताना त्यांना अडवण्यासाठी पवारांनी हे पाऊल उचलले आहे काय? असा सवाल या अग्रलेखात उपस्थित केला आहे.

याआधी देखील माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती, तेव्हा कुणाला काही व्यक्तिगत निर्णय घ्यायचे असतील तर तो त्यांचा प्रश्न, पण 'पक्ष' म्हणून आम्ही भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेणार नाही, असे दोघांकडूनही स्पष्ट करण्यात आले होते. याच पार्श्वभूमीवर, उद्या राष्ट्रवादीचे काही आमदार वगैरे गेले तरी जिल्हा स्तरावरील फळी आपल्याच मागे राहावी यादृष्टीने जनमानस तपासण्याचा हा एक धक्का प्रयोग असू शकतो, असा तर्क ठाकरे गटाने मांडला आहे.

हाच मुद्दा विचारात घेतला तर, कदाचित पक्षातील एका गटाकडून होणारे संभाव्य बंड टाळण्यासाठी शरद पवारांनी हा निर्णय घेतला असावा, असे काही राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. ९०च्या दशकात ज्याप्रमाणे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पक्षप्रमुख पद सोडत असल्याचे जाहीर केले आणि नंतर कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करत, ते पद स्वीकारून पक्षावरील पकड आणखी घट्ट केली होती, त्याप्रमाणे आता एक पाऊल मागे घेऊन पुन्हा अध्यक्षपद स्वीकारून पक्षावरील पकड आणखी घट्ट करण्याचा योजना शरद पवारांची असू शकते. त्याचबरोबर संघटनेत दुसऱ्या क्रमांकाचे एखादे पद निर्माण करून त्यावर खासदार सुप्रिया सुळे यांची नियुक्ती केली जाईल आणि आपल्या मार्गदर्शनाखाली त्यांना पक्षबांधणी आणि पक्षव्यवस्थापनाचे धडे शरद पवार देऊ शकतात.

याव्यतिरिक्त, अध्यक्षपद सुप्रिया सुळे यांना देण्यात यावे, असे मानणारा मोठा गटही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. त्यानुसार निर्णय झाला तर, पक्षाची सूत्र सुप्रिया सुळेंकडे राहतील आणि प्रफुल्ल पटेल यांच्यासारखे पवारांचे विश्वासू नेत्यांची मार्गदर्शन समिती नेमली जाऊ शकते. पवारांनी अध्यक्षपदाची भाकरी फिरवली आहेष्ठ आता ती स्वत:च्या की लेकीच्या ताटात टाकणार हे पाहावे लागेल.

-------------------------

### अजित पवारांकडे अध्यक्षपद ....

लहान आहेत. मी आजही कामकाज पाहत आहे. त्यामुळे शरद पवार यांनी निवृत्तीचा निर्णय खुप घाईत घेतला असल्याचे शालिनीताई पाटील म्हणाल्या.

शरद पवार यांनी अध्यक्षपदाचा राजिनामा दिल्यानंतर नवा अध्यक्ष कोण अशी चर्चा सुरू झालेली असतानाच अजित पवार, सुप्रिया सुळे आणि जयंत पाटील यांची नावे अध्यक्षपदासाठी आघाडीवर असल्याचे समोर आले, मात्र शालिनीताई पाटील यांनी सुप्रिया सुळे यांना पसंती दर्शवत अजित पवारांवर मोठे आरोप केले आहेत. त्या म्हणाल्या की, अजित पवार घोटाळेबाज असून काही गुन्ह्यामध्ये अडकले असल्याने त्यांना कधीही अटक होऊ शकते. त्यामुळे त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद देणे चुकीचे ठरेल, असे मत शालिनीताई पाटील यांनी व्यक्त केले. भाजपाचे मोठे नेते अजित पवारांच्या पाठीशी आहेत. त्यामुळे त्यांच्यावर अद्याप ईडीकडून चौकशी झालेली नाही. हसन मुश्रीफ यांची चौकशी होते, मग चौदाशे कोटी मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी अजित पवार यांना चौकशीसाठी का बोलावले जात नाही? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

------------------------------

### सामनाच्या अग्रलेखातून आग .....

प्रसार माध्यमांशी बोलताना नितेश राणे म्हणाले की, ‘मी पहिल्या दिवसापासून सांगतोय, आग लावणे, चोमडेगिरी करणे, नाना पटोलेंच्या भाषेत चोमडेगिरीमध्ये पी. एचडी केलेली आहे. आजच्या सामन्यातून पवार कुटुंबियांच्यामध्ये आग लावण्याचे काम करण्यात आलेले आहे. त्यामुळे आजचा सामनामधील अग्रलेख महाराष्ट्राच्या जनतेने नीट वाचावा. पवारसाहेबांना कळकळीची विनंती करतो की, राऊतांना घरी घेऊ नका. हे घरी घेण्याच्या लायकीचे नाही. परत परत आग लावण्याचे काम राऊत करत आहेत. एक डोळा पवार कुटुंबावर तर दुसरा डोळा तेजस आणि आदित्य ठाकरेंवर आहे,’ असे म्हणत राणेंनी संजय राऊत यांच्यावर हल्लाबोल केला.

ज्याप्रमाणे संजय राऊत हे सौदेबाजीचे राजकारण करत आहेत, तसेच उद्धव ठाकरेंनी देखील केलेले आहे, असे नितेश राणे यांच्याकडून सांगण्यात आले. याबाबत बोलताना नितेश राणे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या आयुष्यात काही वेगळे केलेले नाही, हेचं केलं आहे. नारायण राणेंनी शिवसेना का सोडली? कारण शन्मुखानंदमध्ये झालेल्या सभेत राणे साहेबांनी उद्धव ठाकरे आणि त्यांची लोकं तिकीट विकत आहेत, हे सत्य मांडले. ज्यानंतर राणे साहेबांच्या विरोधात उद्धव ठाकरेंनी षड्यंत्र केलं. यांचे पूर्ण राजकारण हे पैशांवर चालणारे आहे, असा घणाघात नितेश राणेंनी केला.

-----------------------------

### भारतीय जनता पार्टीचे प्रदेश ...

संजय कुटे,हरिश पिंपळे यांची नावे या जंम्बो कार्यकारणीत कुठे नव्हती. तर भाजपा प्रदेश कार्यकारणी जाहिर झाल्यानंतर आता जिल्हाध्यक्ष व महानगर अध्यक्ष यांची घोषणा लवकर होईल काय असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे.

---------------------

### नाफेडचे नियम व निकष ....

हे शेतकऱ्यांच्या जिवावर उठले असून त्यात शिथिलता आणून ज्या नाफेड केंद्रांवर शेतकऱ्यांची नोंदणी संख्या जास्त आहे अश्या केंद्रांवरील शेतकऱ्यांना इतर केंद्रांवर वर्ग करण्याची मागणी आज दिनांक २ मे २०२३ रोजी जिल्हा पणन अधिकारी यांना शेतकरी पुत्र गोपाल पोहरे यांच्या माध्यमातून निवेदन देऊन करण्यात आली.नोंदणी संख्या जास्त असलेल्या केंद्रावरील शेतकरी इतर केंद्रांवर वर्ग करा शेतकरी पुत्र गोपाल पोहरे याची मागणी

------------------------

### कोण होणार अकोल्याची....

त्याच बरोबर वैयक्तिक बक्षीस देखील या केक क्विन स्पर्धेत देण्यात येतील. आर आर सी नेटवर्क सिटी मैत्रिण प्रस्तुत अकोला केक क्विन कॉम्पिटीशन २०२३ ची घोषणा झाली आहे. ही स्पर्धा ८ मे रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत होणार आहे. स्पर्धेच्या दिवशीच स्पर्धेचा निकाल जाहिर होणार आहे हे विशेष. उमरी रोडवरील हॉटेल सेंट्रल प्लाझा येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी संपर्क करा ९८९०५१८५८२ किंवा ९९२३४५५४०५. या स्पर्धेचे पॉर्टनर आहेत स्वादब्रह्म कॅटरर्स, ड्रिम स्काय यांचा सहभाग राहणार आहे. श्री भगवती साडी कलेक्शन तर्फे ५००० रुपयाची पैठणी, अंशुल फॉर डेजर्ट तर्फे स्पेशल पर्सनलाईज गिफ्ट हॅम्पर ,आय आर जी एच पी वर्ल्ड तर्फे स्मार्टवॉच, प्रीतीज डिलाईट तर्फे स्पेशल गिफ्ट हॅम्पर, जीबेरी नैनसी फॅशन तर्फे क्लोथिंग वाउचर, सुहाग महेल तर्फे ज्वेलरी वाउचर देण्यात येणार आहे

------------------

### कॉल्थ मार्केटमध्ये ...

अग्निशमन यंत्रणा तपासत असताना क्लॉथ मार्केट मध्ये ही तपासणी होताना दिसत नाही. दोन्ही कडे वाहनांची पार्किंग यामुळे क्लॉथ मार्केट मध्ये रस्ताच राहिला नसल्याचे चित्र आहे.

## पान ६ वरुन...

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे...

तीन एकरात लागवड केली. आता हातातोंडाशी आलेलं पीक अवकाळी पावसामुळे जमीनदोस्त झालं आहे. गारपीट, पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे पीकाचं नुकसान झालं आहे. जिल्हा प्रशासन तसेच कृषी विभाग यांनी दोन दिवसापासून शेतकऱ्याच्या नुकसान झालेल्या पिकाची पाहणी न केल्याने नुकसानाची आर्थिक मदत मिळणार तरी कधी असा प्रश्न विचारण्यात येत आहे.

### महावितरणच्या संचालक...

लौकीक आहे. तसेच त्यांनी महावितरणच्या केंद्रीय बिलींग प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले असून त्यामुळे ग्राहकांच्या तक्रारी कमी झाल्या असून महावितरणच्या महसुलात वाढ झाली आहेत.

## पान ३ वरुन...

### कथास्थळी...

आवश्यक आहे. तसेच मंडपात केलेल्या अंतर्गत विद्युत व्यवस्थेचेही सुरक्षेच्या दृष्टीने ऑडीट करावे. सभा मंडप, स्वयंपाकाची जागा इ. ठिकाणी अग्निशमन संयंत्रे ठेवावी. अग्निशमन संयंत्र चालविण्याबाबत आपत्ती व्यवस्थापन दलाकडून स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले जाईल. अन्न, पाणी यांचे नमुने तपासले जावे. तयार होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी स्वयंसेवकांची व्यवस्था असावी. प्रशासनाच्या वतीने डॉक्टरांसह आरोग्य पथक, चार रुग्णवाहिका, अग्निशमन बंब, इ. उपाययोजना करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आयोजक आणि प्रशासन यांच्यात समन्वय राखण्यासाठी मध्यवर्ती कक्ष कार्यान्वित करावा. तसेच आपत्ती व्यवस्थापन दलाची दोन पथके कथास्थळी तैनात असतील, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

कथा कार्यक्रमा दरम्यान रविवार दि.७ रोजी ‘नीट’ परीक्षा आहे. या परीक्षेचे केंद्र पातूर रोडवरील शाळेतच असल्याने परीक्षार्थी विद्यार्थी, त्यांचे पालक, त्यांची वाहने सुयोग्य पद्धतीने परीक्षा केंद्रात जातील याबाबत प्रशासनाने नियोजन करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

### आयटीआय मुलींची...

पाहुणे जयंतराव पडगिलवार यांचे पुष्पगुच्छ देऊन संस्थेत स्वागत केले.याप्रसंगी राष्ट्रगीत, महाराष्ट्र राज्यगीत तसेच राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली . कार्यक्रमाला संस्थेतील समस्त कर्मचारी वृंद तसेच प्रशिक्षणार्थीनी उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता आयटीआय मुलींची अकोलाच्या समस्त कर्मचारी वृंदांनी अथक परिश्रम घेतले अशी माहिती संस्थेचे शिल्पनिदेशक अरविंद पोहरकर यांनी एका महिती पत्रकाद्वारे दिली.

### अमरनाथ यात्रेसाठी ...

निलेश पंडे, मनीष अग्निहोत्री, दत्ता पाटील, गजानन नवथळे हे सर्व शिवभक्त उपस्थित होते.

### कोविडः एक...

आरटीपीसीआर ‘एक’

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळेतील आरटीपीसीआर चाचण्यात एका महिला रुग्णाचा अहवाल पॉझिटीव्ह आला. ही महिला महापालिका हद्दीतील रहिवासी आहे, अशी माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातून मिळाली.

सक्रिय रुग्ण ‘२७’

जिल्ह्यात एकूण पॉझिटीव्ह अहवालांची एकूण संख्या ६६२०९ (५००७६ + १५१४२ + ९९१) आहे. तर सद्यस्थितीत जिल्ह्यात २७ सक्रिय रुग्ण आहेत, अशी माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातून देण्यात आली आहे.

### श्रींचा सच्चा सेवाधारी ...

झाले. गुरुजींची पादुका संस्थान मुंडगाव च्या माध्यमातून संस्थान करीता खुप मोठी सेवा, त्याग व योगदान होते. संस्थानचे ६५ गावात २००० पुरुष व महिला सेवाधारी आहेत. या सर्व सेवाधारी गटांच्या सेवेच्या नियोजनाची जबाबदारी गुरुजींनी आपल्या खांद्यावर घेतली होती. व ती शेवटच्या श्वासापर्यंत निभावली.व ती यशस्वीपणे पार सुद्धा पाडली. पादुका संस्थान विश्वस्त मंडळाकडून ६५ गावात ग्राम स्वच्छता अभियान, वृक्षारोपणाचे मिशन ऑक्सिजन अभियान, पंढरपूर व शेगाव पायदळ वारी, संस्थानचे सर्व भव्य उत्सव, सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यात श्री बायस्कर गुरूजी यांचा सिंहाचा वाटा आहे. हे मुंडगावातील व पंचक्रोशीतील श्रींच्या भक्तांना सर्वश्रुत आहे.

संस्थानच्या प्रत्येक महत्वपूर्ण घडामोडी चे साक्षीदार असलेल्या गुरुजींनी संस्थान च्या देणगीत भर पडावी म्हणून सेवाधाऱ्यांच्या आर्थिक योगदानातून संस्थान करीता पिण्याच्या पाण्याचा टँकर, पिठाची गिरणी, गर्दी चे नियंत्रणाकरीता लोखंडी बॅरिकेड्स करुन ठेवले होते. मंदिरातील दर गुरुवार चा महाप्रसाद व एकादशी फराळाचे नियोजनाकरीता ते न चुकता हजर राहत होते. आज त्यांच्या दुखःद निधनाने विश्वस्त मंडळासह सर्व सेवाधारी पोरके झाले असून, एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. बायस्कर गुरूजींनी पादुका संस्थान च्या माध्यमातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला येथे मरणोत्तर देहदान संकल्प केला होता, परंतु वैद्यकीय महाविद्यालयाच्या तांत्रिक अटी अडचणी मुळे बायस्कर गुरूजींचा अंतिम संस्कार त्यांच्या गावी शिरसोली येथे उद्या दि.२ मे रोजी सकाळी ११ वाजता पार पडले बायस्कर गुरूजी यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### दस्तनोंदणी कार्यालय ...

यांनी कळविले आहे. दर बुधवार व गुरुवारी हे कार्यालय बंद असेल असेही आदेश प्राप्त झाले आहेत. यासंदर्भातील अंमलबजावणी ही दि.२९ एप्रिल पासून सुरु झाली आहे. याची नागरिकांनी नोंद घ्यावी व जिल्ह्यातील जनतेस आपल्या व्यवहारांची दस्त नोंदणी प्रत्येक शनिवार व रविवारी करता येईल, असे मुद्रांक जिल्हाधिकारी तेलंग यांनी कळविले आहे.

### सुयश प्राप्तीसाठी ...

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्रीराम कृष्ण विवेकानंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ जयंत कावरे तर संस्थेचे उपाध्यक्ष डॉ सत्यनारायण बाहेती हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत खत्री तसेच व्यवस्थापक राहुल देशमुख उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी डॉ सत्यनारायण बाहेती यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या मैं सबसे श्रेष्ठ हूँ। और मै सब कुछ कर सकता हूँ असं विद्यार्थ्यांकडून म्हणून घेत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित केला. गणित विषय शिक्षिका निकिता दूधे, तसेच इंग्रजी विषय शिक्षिका सौ सीमा पारतवार आणि प्रशिक्षक कार्तिक झोंबाडे यांना सुद्धा प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती गावंडे व सीमा परतवार यांनी उत्तमरीत्या केले तर आभार प्रदर्शन प्रीती शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पद्मिनी शिंदे, सावित्री विश्वकर्मा, मंजुषा शर्मा, संतोषी शर्मा ,पूनम गावंडे ,कल्पना पोहरे, शिवानी बैस, किरण तायडे, योगिता सरनाईक ,सुषमा दाभाडे, प्रतिभा दुधे तसेच कार्तिक झोंबाडे यांनी परिश्रम घेतले.तसेच शिक्षकेतर कर्मचारी विवेक मेटांगे, वेदांत इंगळे, मुकेश अस्वारे तसेच सेविका करुणा बागडे ,ज्योती इंगळे ,रेणुका दुधे, अश्विनी सरोदे व साधना गोपनारायण यांनी परिश्रम घेतले.

### सनदी लेखापाल...

होण्याकरिता प्रयत्न करावेत असे म्हणून कोड ऑफ इथिक्सची अद्यावत माहिती देत ही बाब प्रॅक्टिस करतांना अंमलात आणण्याचे आवाहन केले.यावेळी पॅकेज स्कीम ऑफ इंसेंटिव्ह २०१९ या विषयावर सीए पंकज अग्रवाल यांनी तर कोड ऑफ इथिक्स या विषयावर सीए जितेश सागलानी नागपूर यांनी मार्गदर्शन करून सनदी लेखापालांच्या प्रश्नांचे निरसन केले.संचालन सीए अपूर्वा बजाज यांनी तर आभार सीए भूषण जाजू यांनी मानलेत.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकारणी मंडळाने प्रयत्न केले असल्याची माहिती जनसंपर्क समितीचे अध्यक्ष सीए रमेश चौधरी यांनी दिली.

# साप्ताहिक भविष्य दर्पण

**१ से ७ मई २०२३**

पं. सुदर्शन शर्मा शास्त्री
ज्योतिषाचार्य तथा भागवताचार्य
अकोला
मो.9422860311



**मेष :** सोम- धार्मिक स्थलों के दर्षन-बडों का आर्षिवाद मार्गदर्षन-मानसिकषांति-व्यापार व्यवसाय के विकास पर धन व्यय

मंगल-बुध-सामाजिक और रचनात्मक कार्यो से जुडने का अवसर-रूके हुए सरकारी कार्य पुर्णता की ओर-रोजगार की दिषा में चल रहे

गुरू- शुक्र -फायदे का रास्ता-चीजे धीरे धीरे षेप लेने लगेगी -सफलता और समृध्दि के दौर से गुजरने की खुषी-प्रयास पुर्ण

शनि-बडे भाई बहनों का सहयोग मिलेगा-कॉन्फिडस से आगे बढें-आप काम को करते समय एक बडा नजरिया लेकर चलते हैं.-

रवि-चिंता उत्पन्न होगी-आप पर कोई गुस्सा हो आप बहस में न पडे-यात्रा में सावधानी-अपने ही विवेक से काय

यह सप्ताह रविवार प्रतिकुल बाकी अनूकुल रहेगा



**वृषभ :** सोम- भावनाओं में न बहें -बाजार में रूपया फसने से अर्थचक्र में व्यवधान-उधार लेन देन की प्रक्रिया में सावधानी

मंगल-बुध- शुभ कार्य-स्वयं को ईष्वर के करीब-गुरूओं संतों का आर्षिवाद-श्रेष्ठ लोगों से मुलाकात-जीवन यापन सुविधा संपन्न होगा

गुरू-शुक्र-आपको एक अच्छे मोटिवेटर का काम करना होगा-अतिरिक्त मेहनत से आप प्रोफेषनल दिक्कतों से बाहर निकलने में सफल रहेगें-

शनि-नया क्रिएटिव वेंचर पॉजिटिव ग्रोथ देने से पहले समय लेगा-प्रोफेषनल तौर पर आपकों कई फायदे होगें-अपने जुनियर्स के लिए बेहद हेल्प फुल रहेगें- रवि-अपने समय को परिवार के मुताबिक ऑर्गनाइज करने की कोषिष करें ,ताकि आप परिवार के साथ बैठकर समय बिता सकें-आप फिजिकली और मेंटली फिट

यह सप्ताह सोमवार प्रतिकुल बाकी अनुकुल

**मिथून :** सोम-अपेक्षित प्राप्तीयॉं-दांपत्य जीवन खुषहाल-मन प्रसन्न-विवाह कार्य में गति-बेरोजगारों को रोजगार के अवसर

मंगल-बुध-व्यवहार कुषल बनें-पुराने रोग परेषान-काम के बर्डन से काफी तनाव में-घर मे किसी से बहस न करे,टेंषन

गुरू-षुक्र- मांगलिक व पारिवारिक कार्य-परिवार की आर्थिक सुरक्षा के लिए बडी योजना बना सकते है-दान पुण्य के कार्य

शनि-दिमाग सानुकुल-अच्छे लोगों से मेलजोल-सत्कर्मा में रूचि-आमदिनों की तरह काम होते रहेगे

रवि-आपके वर्क एरिया में कोई सेलिब्रेषन होगा-फाइनेषल ग्रोथ अच्छी रहेगी-करियर के मामले में सीनियर्स का आर्षीवाद आपके साथ रहेगा-

यह सप्ताह मकर जातको के लिए मंगल-बुध प्रतिकुल बाकी अनुकुल

**कर्क :** सोम -व्यवसायिक यात्रा-अनायास धन प्राप्ती-विरोधी परास्त-नये संबंध लाभदायक

मंगल- बुध- व्यापारीयो को आर्थिक संतुष्टि-अविवाहितों कोषुभ समाचार-पारिवारिक प्रतिष्ठा में वृध्दि-धन यष की प्राप्ती

गुरू- शुक्र-मन अस्थिर-स्वास्थ्य पर विपरित प्रभाव-आपसी समझ से मतभेद दुर-द्रव्य का व्यय-

शनि-ऋण प्राप्ती में रूकावटें- कागजात दस्तावेजों पर व्यय-सहयोगीयों से मतभेद-लेनदार दबाव-

रवि-ओपन माइंड से चलकर ही आप दुसरों को अच्छे से अंडरस्टैड कर पांएगें-केवल फाइनैषल ही नहीं स्प्रिचुअल क्षेत्र में भी आपकी तारीफ होगी-

यह सप्ताह गुरू से षनिवार प्रतिकुल बाकी अनुकुल रहेगा

**सिंह :** सोम-आप नए लोगों से मिलकर बेहद खुष होगें-यही मौका हैं जब आपको अपने को साबित करने की जरूरत हैं. मंगल-बुध-प्लान के अनुसार काम-नई जगहो की सैर-कोई भी पल बेकार न जाने दे-षत्रुओं का षमन गुरू- शुक्र- व्यापार में नई कार्ययोजना पर अमल-नयें संबंध स्थापित होगे-दांपत्य जीवन में मधुरता-हास परिहास का वातावरण

षनि-बेरोजगारों को रोजगारों के अवसर-व्यापार में मनवांछित कार्य -कलात्मक कार्ये में रूचि-धन यष की प्राप्ती

रवि-ऋण वसुली में परेषानी-स्वास्थ्य के प्रति सजग-विवादों में न उलछे-पुर्व संचित द्रव्य का अपव्यय- यह सप्ताह रविवार प्रतिकुल बाकी अच्छा

यह सप्ताह मीन जातको के लिए गुरूवार षुक्रवार प्रतिकुल बाकी अनुकुल

**कन्या :** सोम-वाहन संबंधी व्यय-मातृपक्ष से विरोध-बकाया प्राप्ती में परेषानी-सरदर्द

मंगल-बुध-संतान से अच्छी बनेगी-कोष में वृध्दि-विद्यार्थी वर्गको सफलता-आर्थिक मामलों में प्रगती

गुरू- शुक्र-वित्त प्राप्ती अच्छी-व्यवसायिक संबंध में छोटी यात्रा-विरोधी समझौतो का प्रयास-हर्जाना आदि प्राप्ती शनि-रूका हुआ धन प्राप्ती-षत्रुओं का षमन-विवादास्पद मामलों में विजय-प्लान के अनूसार कार्य

रवि-व्यापार में लाभ-निर्माण कार्य में गति-गृहस्थ जीवन में आपसी सांमजस्य से कार्य -उत्साही वातावरण

यह सप्ताह सोमवार प्रतिकुल बाकी अनुकुल

**तुला :** सोम-चिर प्रतिक्षित समाचार-छोटो से सहयोग-आर्थिक योजना को बल-विद्या बुध्दि का लोहा

मंगल-बुध-आहार विहार का ध्यान-जमीन जायदाद संबंधी व्यय-वाहन मषिनरी का संचालन-मानसिक उधेडबुन गुरू-शुक्र-आपका श्रम और आपकी समझदारी आपके लिए लाभदायी रहेगी-सहयोग-धन प्राप्ती -ख्याती

शनि-प्रतियोगिता में सफलता-रचनात्मक कार्य -स्वजनों का सहयोग-बजट बनाकर कार्य

रवि-संबंधों में निकटता आएगी---किसी मुल्यवान वस्तु के पाने की अभिलाषा पूरी होगी-बुध्दिमत्ता के अज्ञात क्षेत्रों की ओर आप आकर्षित होग

यह सप्ताह मंगल-बुध प्रतिकुल बाकी अनुकुल

अब बढते हैं ज्योतिष ज्ञान पर . हमारी झंखला प्रारंभ की हैं राशि और रंग . जिसमे हमने वृश्चिक राशि के साथ रंगो का तालमेल कैसा हैं वह देखा था. आज हम धनु राशि के साथ रंगो की बात करेंगे.

**वृश्चिक :** सोम-आप परिवार व दोस्तों के लिए ज्यादा जिम्मेदार होकर उभरेगें -नयी भुमिका आप एन्जाय करेंगे-विवादों से बचें

मंगल-बुध- षुभ समाचार की प्राप्ती-भाईयों से सहयोग-स्थाई व्यापार की ओर प्रयास सफल-खुषी का माहौल

गुरू- शुक्र-तकनीकी कार्य सर्तकता से -अस्थिर स्वभाव व उतावलेपन पर नियंत्रण-प्रभावषाली सज्जनों विष्वास खोयेगे

शनि- भारी वाहन पर व्यय-आमदनी में बंधन-मातृपक्ष से विरोध-क्रेध व हठधर्मिता की प्रवृत्ति घातक-

रवि-आप अपनी पहचान बनाने में कामयाब रहेगें-आप घर में दोस्तों को इनवाइट करेंगें और सेलिब्रेषन का प्लान बनाएंगे- यह सप्ताह गुरू से षनिवार प्रतिकुल बाकी अनुकुल रहेगा

**धनु :** सोम-परिचय का दायरा-अच्छी आदतों का सही इस्तेमाल करना सिखें-दिनचर्या व्यवस्थित करें-विवाद समाप्त

मंगल-बुध-आय के स्त्रोतो में वृध्दि-मैत्री संबंधों का लाभ-कोई मनोरंजक यात्रा-क्रय विक्रय में लाभ

गुरू-षुक्र-इच्छाषक्ति में वृध्दि-सौभाग्यषाली समय-ग्रुप एक्टिवीटीज् में हिस्सा लेगें-सम सामायिक कार्या में राहत

शनि-व्यापारी वर्ग का कारोबार बढाने में सफलता-दीमाग सानुकुल बनेगा-अचानक यात्रा के अच्छे परिणाम निकलेगे

रवि-धैर्य बनाये रखेगें तो आपके लिए स्थिति को हैंडल करना आसान रहे-कम्यूनिकेषन की कमी से नए प्रोजेक्ट्स में देरी होगी-

यह सप्ताह रविवार प्रतिकुल बाकी अनुकुल

**मकर :** सोम-अनावष्यक व्यय-मानसिक तनाव-घरेलु मामलों में मौन-वैचारिक मतभेद-ऑर्गनाइज करके चलेंगे तो कई तरह के तनाव से बचें रहेग

मंगल-बुध-कार्य को उत्साहित मन से-आलस्य का त्याग करें-दिनचर्या सुव्यवस्थित करें-मित्र मंडली बढेगी- गुरू-षुक्र-रूके कार्य गतिषील-वस्त्र आभुषणों की खरिदी-व्यापार में पुंजीं लगाना श्रेयस्कर-दोस्तों के साथ टाईम गुजरेगा

शनि-अच्छी अंडरस्टैडिंग से ही आप दुसरों की इच्छाओं पर खरे उतर पाएंगें-फाइनैंषल मामले आपके कंटोल में रहेगें-

रवि-जुगाडबाजी के तौर तरीके अपनाकर कार्य पुर्ण-सुखद अनुभुति-खुषी का माहौल-चिर प्रतिक्षित आकांक्षाओं की पूर्ति-

यह सप्ताह सोमवार प्रतिकुल बाकी अनुकुल

**कुंभ :** सोम-आर्थिक तनाव से मुक्ति-बुर्जुगो का आर्षिवाद-पुर्ण सहयोग एवं सम्मिलित प्रयास से सफलता-प्रसन्नता

मंगल-बुध-वैचारिक मतभेद-षरीर स्वास्थ्य का ध्यान-जारी कार्य में बाधा-संकोच छोडकर दुसरों से मिलें

गुरू- शुक्र-दिनचर्या व्यवस्थित करें-लोकप्रियता में वृध्दि-उत्साह का वातावरण-रूके कार्य बनते नजर आऐगें शनि-मन शांत और प्रसन्न-स्वजनां से सहयोग-जीवनषैली में सुधार-काम का बोझ थकाने वाला

रवि- आर्थिक रूप से स्थिती बेहतर-धनिष्ठता बढेगी-गीत नृत्य तथा ललित कलाओं में मन लगेगा-आषावादी रहेगे

यह सप्ताह मंगल,बुध प्रतिकुल बाकी अनुकुल

**मीन :** सोम-अधिनस्थो का सहयोग-जारी प्रयास पुर्णता की ओर अग्रसर-सामाजिक पद प्रतिष्ठा बढेगी-श्रम सार्थक

मंगल-बुध- आय के नये विकल्प उपलब्ध-बढोत्तरी और प्रगति दो कुंजी-घर के सदस्यों के कारण जरूरी कामों में राहत

गुरू-षुक्र-मानसिक क्लेष-कमर मे पीडा-जल्दबाजी, क्रोध और स्वछंद स्वभाव पर नियंत्रण-संगति का ध्यान

षनि-कार्यक्षेत्र मे थिथिलता-मिथ्या निंदा का भय-किसी अघटित घटना को लेकर मानसिक तनाव-आकस्मिक व्यय

रवि-आत्मबल में वृध्दि-व्यस्तता अधिक-परिचय का दायरा-आमदनी में इजाफा

यह सप्ताह गुरूवार से षनिवार प्रतिकुल बाकी अनुकुल

ये हैं १२ राषियों का हाल १ से ७ मई २०२३ तक

जय श्री राम जय श्री राम



## मधमाशी पालकांना पुरस्कार; मध उत्पादक व्यक्ती व संस्थांकडून अर्ज मागविले

**अकोला:** मधसंचालनालय, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ महाबळेश्वर जि. सातारा येथे दि.२० मे रोजी जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून मधमाशापालन उद्योगात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना मधमाशी मित्र पुरस्कार दिला जातो. मधमाशी उद्योगात सातेरी, मेलिफेरा, आग्या अशा मधमाश्यांचे संगोपन करुन मधाचे उत्पादन घेणाऱ्या व्यक्ती व संस्थांनी आपले अर्ज पाठवावे, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, अकोला यांनी केले आहे. इच्छुक व्यक्ती व संस्थांनी आपले अर्ज महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, महसूल कॉलनी, सरकारी आयटीआय समोर अकोला येथे संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्रीमती एन.टी.लवाळे व तांत्रिक आर.एम. बिलबिले यांच्याशी दूरध्वनी ०७२४-२४१४२५० अथवा मोबाईल क्रमांक ८४३२९८९१२३ वर संपर्क साधावा.

# कथास्थळी सुरक्षा, स्वच्छता उपाययोजनांची सज्जता ठेवा

### ◆ जिल्हा प्रशासनाचे आयोजकांना निर्देश

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** म्हैसपूर ता. अकोला येथे आयोजित शिव महापुराण कथा कार्यक्रमास जमणाऱ्या भाविकांच्या संख्येचा आयोजकांनी दिलेला अंदाज पाहता आयोजकांनी कथा स्थळी सुरक्षा, स्वच्छता उपाययोजना कराव्या, असे स्पष्ट निर्देश जिल्हा प्रशासनाने आज आयोजकांना दिले.

शिवमहापुराण कथा आयोजनासंदर्भात जिल्हा प्रशासनाने आज जिल्हा नियोजन भवनात बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस जिल्हाधिकारी निमा अरोरा, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय खडसे, सहायक आयुक्त अन्न औषध प्रशासन सागर तेरकर, म्हैसपूर सरपंच मिनाताई इंगळे, ग्रामसेवक आर. बी. अटकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष राऊत, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम दिनकर नागे, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता राकेश जवादे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मिनाक्षी गजभिये, तहसिलदार सुनिल पाटील तसेच विविध



विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने विजय दुबे व रुपेश चौरसिया तसेच त्यांचे अन्य सहकारी उपस्थित होते.

आयोजकांनी त्यांच्या वतीने दि. ५ पासून होत असलेल्या कथा कार्यक्रमाच्या तयारीची माहिती सांगितली. कथा कार्यक्रमास जमणाऱ्या भाविकांच्या आरोग्य, जेवण, पाणी, स्वच्छता, अग्निशमन यंत्रणा, विद्युत यंत्रणा, मंडप उभारणी, वाहतुक व्यवस्था यासंदर्भात माहिती सादर करण्यात आली.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने पोलीस यंत्रणा सुरक्षेच्या व वाहतुक नियमनाच्या दृष्टीने तैनात असेल. ३०० ते ३५० पोलीस जवान (महिला- पुरुष), अधिकारी तसेच २५० होमगार्ड (महिला पुरुष) तैनात असतील,असे पोलीस अधीक्षक घुगे यांनी सांगितले.

त्यांनी आयोजकांना सुचना केली की, सभा स्थळी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून एक नियंत्रण कक्ष तयार करण्यात यावा. भाविकांसाठी येण्या- जाण्याचे तसेच विविध सुविधांकडे जाण्याचे दिशादर्शक फलक लावणे आवश्यक असेल. तसेच भाविकांची गर्दी एकाच ठिकाणी होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी प्रसाद वा अन्य काहीही वस्तू वाटप आदींचे आयोजन करु नये. जेवणाचेही स्टॉल्स अनेक ठिकाणी लावावे, जेणे करुन जेवणाच्या ठिकाणी लोकांची गर्दी होऊ नये. पिण्याच्या पाण्याची सोय ठिकठिकाणी असावी. कथास्थळी तयार होणारे अन्नपदार्थांचे नमुने अन्न औषध प्रशासन विभागाचे अधिकारी तपासणी करतील. अन्न औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त सागर तेरकर यांनी सुचना केली की, अन्न शिजवून झाल्यानंतर ते कमीत कमी कालावधीत लोकांना वितरीत करावे. अन्न जास्त काळ ठेवू नये. तसेच दुग्धजन्य पदार्थांचा भोजनात समावेश करु नये.

जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी सांगितले की, कथा मंडपाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे ➤ पान २ वर

## थोडक्यात महत्वाचे

### आयटीआय मुलींची अकोला येथे जयंत पडगिलवार यांच्या हस्ते ध्वजारोहण



**अकोला:** स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) अकोला येथे महाराष्ट्र दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.महाराष्ट्र दिनाचे प्रमुख अतिथी, सुप्रसिद्ध उद्योजक तथा औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलींची अकोलाच्या आयएमसी समितीचे अध्यक्ष जयंतराव पडगिलवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलींची अकोलाचे प्राचार्य शरदचंद्रजी ठोकरे हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी प्रमुख ➤ पान २ वर

### जात वैधता प्रमाणपत्र; त्रुटी पुर्तता करण्याचे आवाहन

**अकोला:** विद्यार्थी, सेवा आणि निवडणूक प्रयोजनासाठी ज्या अर्जदारांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अकोला यांच्या कडे जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज केला असेल त्यांनी दि.८ ते १२ मे या दरम्यान त्रुटी पूर्तता कराव्या असे आवाहन करण्यात आले आहे. जे अर्जदार या कालावधीत त्रुटींची पूर्तता करणार नाहीत त्यांची प्रकरणे बंद करण्यात येतील, असे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य यांनी कळविले आहे.

### कोविडः एक पॉझिटीव्ह

**अकोला:** आज दिवसभरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळेतून कोरोना संसर्ग तपासणीत (आरटीपीसीआर) ६० जणांचा अहवाल प्राप्त झाला. त्यात एकाचा अहवाल पॉझिटीव्ह आला , असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयामार्फत कळविण्यात आले आहे.

आजचे एकूण पॉझिटीव्ह-आरटीपीसीआर (शा.वै.म.१ व खाजगी ०)०+ रॅपिड ॲन्टीजेन चाचणी ० + एकूण पॉझिटीव्ह ०. ➤ पान २ वर

### श्रींचा सच्चा सेवाधारी ह.भ.प. ज्ञानदेव राव महाराज बायस्कर यांचे निधन



**अकोट:** श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगाव चे सेवाधारी प्रमुख श्री ज्ञानदेवराव मारोतराव बायस्कर गुरूजी ह्यांनी दि. १ मे रोजी गजाननाच्या चरणी आपला देह त्यागला आहे. जि प. प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक बायस्कार गुरुजींचे वयाच्या ७२ व्या वर्षी हृदयविकारामुळे निधन ➤ पान २ वर

## तेल्हारा येथे जातवैधता प्रमाणपत्र मार्गदर्शन शिबिर



प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे व महासंचालक डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या संकल्पनेनुसार राबविण्यात आलेल्या सामाजिक समता पर्व अंतर्गत शुक्रवारी (दि.२८ एप्रिल) आयडीयल ॲकेडमी, तेल्हारा येथे जातवैधता प्रमाणपत्र बाबत मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. किरण निखाडे आणि सै.रफीक सै.हुसेन यांनी विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर ऑनलाईन अर्ज सादर करुन कागदपत्रसह जातपडताळणी अकोला या कार्यालयात जमा करावे .जेणेकरून प्रवेश घेताना अडचण येणार नाहीत. आणि ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये त्रुटी आहेत त्यांनी त्रुटीची तात्काळ पूर्तता करावी, असे आवाहन अकोला समितीचे उपायुक्त उमेश सोनवणे यांनी केले. कार्यक्रमास सचिन बदरखे जातपडताळणी कार्यालयाचे निलेश इंगळे,अंकुश वाकोडे आणि पातुर तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १० वी आणि ११ वी १२ वी विज्ञान शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला कर्मचारी व अधिकाऱ्यांचा सत्कार



प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने शहरांमध्ये विविध विभागांमध्ये जाऊन तेथील कामगारांना विविध विभागातील अधिकाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राजा दरी दरीतून नांद गुंजतो महाराष्ट्र माझा जय जय महाराष्ट्र माझा... महाराष्ट्र नवनिर्माण सेना अकोलाच्या वतीने हिंदू जनक राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने जिल्हा संपर्क अध्यक्ष विठ्ठलराव लोखंडकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष (पश्चिम) राजेश काळे, महिला जिल्हाध्यक्ष प्रशंसाताई मनोज अंबेरे, शहर संघटक अरविंद शुक्ला, शहर अध्यक्ष राकेश शर्मा यांच्या पुढाकाराने १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन हा साजरा करण्यात आला. याचे आयोजन महानगर उपाध्यक्ष(पश्चिम) शेखर पोटदुखे यांनी केले होते. सहकार्य मनसे शहर प्रसिद्धीप्रमुख प्रशांत मगर (पाटील) यांनी केले होते.

यावेळी पोलीस विभाग, विद्युत विभाग व विविध क्षेत्रातील होतकरू उद्योजकांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला व १ मे महाराष्ट्र दिनाच्या सर्वांना शुभेच्छा सुद्धा देण्यात आल्या. यावेळी कुणाल निधाने, सोनू बानोरकर, सचिन तायडे, सुमित मोडके, कुणाल जाधव, अविनाश मुरेकर, महेश मोडतकर, छोटू चांदुरकर, निखिल पराते, दिनेश पराते, सचिन आदी उपस्थित होते.


## अमरनाथ यात्रेसाठी लागणाऱ्या वैद्यकीय चाचण्यांकरिता कॅम्पचे आयोजन करा

### हिंदू सुर्य संघटनेची सर्वोपचार रुग्णालयाच्या डिनकडे निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** अमरनाथ यात्रेसाठी लागणाऱ्या वैद्यकीय चाचण्यांकरिता एका विशेष कॅम्पचे आयोजन करुन त्या कॅम्पच्या माध्यमातून सर्व चाचण्या एकाच ठिकाणी करुन देण्याची मागणी हिंदु सुर्य संघटनेच्या वतीने सर्वोपचार रुग्णालयाच्या डीनकडे करण्यात आली आहे.

अकोला जिल्हा तसेच शहरातील शेकडो शिवभक्त आपले आराध्य दैवत बाबा अमरनाथ यात्रेसाठी जात आहे. त्या यात्रेकरिता त्यांना दहा ते बारा वैद्यकीय चाचण्या करून घेतल्यानंतरच त्यांचा नंबर यात्रेकरिता लागणार आहे. त्याकरिता शिवभक्तांची मोठी गर्दी ही सर्वोपचार रुग्णालयात दिसून येत आहे. या दहा ते बारा वैद्यकीय चाचण्या पूर्ण करण्यासाठी दोन ते तीन दिवस वेळ लागत आहे. हा वेळ वाचविण्याकरिता व शिवभक्तांना



सोईस्कर व्हावे याकरिता हिंदू सूर्य संघटना तर्फे सर्व चाचण्या एकाच ठिकाणी करण्यासाठी एक विशेष कॅम्पचे आयोजन करुन व्यवस्था करावी अन्यथा सर्व शिवभक्तांसाठी हिंदू सूर्य संघटना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल अश्या आशयाचे निवेदन सर्वोपचार रुग्णालयाच्या डीन मॅडम मीनाक्षी गजभिये यांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी हिंदू सूर्य संघटना संस्थापक अध्यक्ष अमोल गीते, राजेश बोटे, ➤ पान २ वर

## महावितरणच्या मानव संसाधन संचालकपदी श्री. अरविंद भादीकर यांची निवड

प्रतिनिधी ४ मे

**अकोला/मुंबई:** महावितरणचे संचालक (मानव संसाधन) म्हणून श्री. अरविंद भादीकर यांची सरळसेवा भरतीद्वारे निवड झाली आहे. त्यांनी आज आपला पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी श्री. अरविंद भादीकर हे कार्यकारी संचालक वितरण आणि मानव संसाधन (प्रभारी) म्हणून कार्यरत होते व त्यांनी या दोन्ही पदांचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला आहे.



अमरावती येथील मूळचे रहिवासी असलेले श्री. भादीकर हे अमरावती शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी. ई. झाले आहेत. मार्च-१९९२ साली तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात जळगाव जिल्ह्यातील भडगाव येथे कनिष्ठ अभियंता म्हणून ते रुजू झाले.

खडका येथील ४०० किव्हो उपकेंद्रात सहाय्यक अभियंता व उपकार्यकारी अभियंता म्हणूनही त्यांनी काम केले. २००५ मध्ये वाशीम विभागाचे कार्यकारी अभियंता तसेच मुख्यालयातील पायाभूत आराखडा, नागपूर ग्रामीण मंडल व अमरावती मंडल येथे अधीक्षक अभियंता आणि अकोला व चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून ते कार्यरत होते.

## दस्तनोंदणी कार्यालय सुरु राहणार दर शनिवार, रविवारी




**अकोला:** जनतेच्या सोईसाठी दर शनिवार आणि रविवारी दस्त नोंदणी कार्यालये सुरु ठेण्याचे निर्देश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी दिले आहेत. त्यानुसार अकोला जिल्ह्यातील सह दुय्यम निबंधक वर्ग-२, अकोला क्रमांक २ हे कार्यालय दर शनिवार व रविवार सुरु राहणार आहे,असे सहजिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विजय तेलंग ➤ पान २ वर


## सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलोनी — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 750734789

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9028296220


## सुयश प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेला धैर्याने सामोरे जावे-प्राचार्य डॉ. जयंत कावरे

### ◆ मा सारदा ज्ञानपीठमध्ये महाराष्ट्र दिन आणि गुणवंतांचा सत्कार उत्साहात संपन्न

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ द्वारा संचालित मा सारदा ज्ञानपीठ गीता नगर येथे महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला . सर्वप्रथम प्राचार्य डॉ.जयंत कावरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व झेंड्याला मानवंदना देऊन राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत चे गायन करण्यात आले.



त्यानंतर गुणवंत विद्यार्थी आणि शिक्षकाचा गुणगौरव सत्कार समारंभ शाळेच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला मान्यवरांच्या हस्ते मा सारदा मातेच्या फोटोचे पूजन करण्यात आले ➤ पान २ वर

## सनदी लेखापाल यांनी उद्योग उभारणीसाठी प्रयत्न करावेत- सीए सीमा बाहेती



प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया अकोला शाखेच्या वतीने स्थानीय तोष्णीवाल लेआउट परिसरातील आयसीएआय भवनात पॅकेज स्कीम ऑफ इन्सेंटिव्ह २०१९ व कोड ऑफ इथिक्स या विषयावर चर्चासत्र मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सनदी लेखापाल अकोला शाखेच्या अध्यक्ष सीए सीमा बाहेती यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करीत सनदी लेखापालांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध अनुदान व प्रोत्साहन योजनेचा उद्योजकांना माहितीच्या द्वारे लाभ देत उद्योग उभारणीसाठी मागास विभागाचा विकास ➤ पान २ वर

## मनोरंजन

# 'प्रत्येक कलाकराने' अमृता खानविलकरबद्दल आशिष पाटीलने मांडले मत



आशिष पाटील हा मराठी चित्रपटसृष्टीतील यशस्वी कोरिओग्राफर म्हणून ओळखला जातो. 'लावणी किंग' अशी ओळख असलेल्या आशिष पाटीलने अनेक गाजलेल्या मराठी चित्रपटांसाठी नृत्य दिग्दर्शक म्हणून काम पाहिले आहे. परंतु त्याचा हा प्रवास सोपा नव्हता याबाबत त्याने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अनेक खुलासे केले आहेत. 'चंद्रमुखी' चित्रपटातील 'बाई गं' या लावणीचे नृत्य दिग्दर्शन आशिषने केले असून यासाठी त्याचे अनेक मान्यवरांनी कौतुक केले आहे. चित्रीकरणावेळी प्रत्येक गाण्यासाठी कशी मेहनत घेतली यावरही त्याने या मुलाखतीत भाष्य केले आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध नृत्य-दिग्दर्शक आशिष पाटीलने नुकतीच राजश्री मराठीच्या 'त्याची गोष्ट' या कार्यक्रमात मुलाखत दिली. यामध्ये त्याने अनेक व्यक्तिगत गोष्टींचा उलगडा करीत सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री अमृता खानविलकर हिने 'चंद्रमुखी' चित्रपटासाठी कशी मेहनत घेतली याचे अनेक किस्से सांगितले आहेत.

# 'मेट गाला' मध्ये कलाकारांना खायला दिले विचित्र पदार्थ




चित्रपट आणि ग्लॅमर इंडस्ट्रीतील सर्वात मोठ्या फॅशन इव्हेंटपैकी एक, 'मेट गाला २०२३' सध्या चर्चेत आहे. या कार्यक्रमात हॉलीवूडपासून बॉलीवूडपर्यंत अनेक कलाकारांनी सहभाग घेतला होता. बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट आणि प्रियांका चोप्रा यांनी 'मेट गाला'च्या रेड कार्पेटवर सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. मात्र, सध्या चर्चा कोणत्याही कलाकाराची नसून 'मेट गाला'मधील जेवणाच्या मेन्यूची आहे. 'मेट गाला'मधील जेवणातील मेनू ऑनलाइन लीक झाला आहे. हा मेन्यू बघून अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. या वर्षी, 'मेट गाला २०२३' ची थीम दिवंगत डिझायनर कार्ल लेगरफेल्ड यांच्यावर आधारीत होती. ही थीम लक्षात घेऊन संपूर्ण कार्यक्रमाची रचना करण्यात आली होती. 'मेट गाला २०२३' मध्ये या थीमला 'कार्ल लेगरफेल्ड : ए लाइन ऑफ ब्युटी' असे नाव देण्यात आले होते. मात्र, या सगळ्यामध्ये आता मेट गालातील जेवणाच्या मेनूची जोरदार चर्चा होत आहे.

## क्रीडा जगत

# विराट- गौतमवर बंदी घाला! गावस्कर यांच्या पाठोपाठ ...

**मुंबई:** विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्यात झालेल्या शाब्दिक चकमकीमुळं क्रीडाविश्वात खळबळ उडाली आहे. टीम इंडियाचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांनीही दोन्ही खेळाडूंवर सडकून टीका केली होती. दोघांनाही कठोर शिक्षा दिली पाहिजे, असं गावसकर यांनी म्हटलं होतं. अशातच आता माजी क्रिकेटर वीरेंद्र सेहवागने दोघांवरही बंदी घालण्याबाबत म्हटलं आहे. माध्यमांशी बोलताना सेहवागने दोघांनाही फटकारलं आहे. माझी मुलंही सामना पाहतात आणि 'बेन स्टोक्स'चा अर्थ त्यांना समजतो, अशा शब्दात सेहवागने प्रतिक्रिया दिली आहे.

सेहवागने म्हटलं की, 'सामना संपल्यानंतर मी टीव्ही बंद केला. सामना झाल्यावर नेमकं काय घडंल, याबाबत मला कल्पना नव्हती. दुसऱ्या दिवशी मी पाहिलं की, सोशल मीडियावर याबाबत खूप चर्चा रंगली होती. जे काही झालं ते योग्य नव्हतं. पराभव झालेल्या संघानी शांतपणे तो स्विकारला पाहिजे आणि पुढे जायला पाहिजे आणि जिंकणाऱ्या संघाने आनंद साजरा केला पाहिजे.'' त्यांना एकमेकांना सांगण्याची गरज का पडलीष्ठमी नेहमी एक गोष्ट सांगतो की, ही माणसं देशाचे आयकॉन आहेत.

# कोहली -नवीन- गौतम गंभीर या वादात रजत शर्मा का होतायत ट्रोल?

**मुंबई:** भारताचा माजी फलंदाज गौतम गंभीर इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) व स्टार फलंदाज विराट कोहली यांच्यातील भांडण सध्या क्रिकेट विश्वात चर्चेचा मुद्दा ठरला आहे. पण याच भांडणात आता अचानक पत्रकार रजत शर्मा हे ट्विटरवर प्रचंड ट्रोल होत आहेत. डीडीसीएचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार रजत शर्मा यांनी लखनऊ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (RCB) यांच्यातील वादात लाईव्ह टीव्हीवर केलेल्या कमेंटवरून हे ट्रोलिंग होत असल्याचे समजतेय. पण ही कमेंट काय होती आणि त्यावर नेटकऱ्यांचे काय म्हणणे आहे हे पाहूया

रजत शर्मा यांचा व्हायरल

रजत शर्मा यांनी इंडिया टीव्हीवरील आपल्या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) तिकिटावर खासदार म्हणून निवडून आल्यानंतर गंभीरचा अहंकार वाढल्याचे विधान केले आहे. शर्मा म्हणाले की, 'विराट कोहली असा खेळाडू आहे जो नेहमीच आक्रमक होता आणि कोणताही मूर्खपणा सहन करत नाही आणि म्हणूनच त्याने गौतम गंभीरला चोख प्रत्युत्तर दिले. पण एकंदरीत, गंभीरचे वागणे खेळाविरुद्ध होते आणि ते माजी खेळाडू किंवा संसद सदस्याला शोभत नाही.

# 'सूर्या' तळपला अन् मुंबई इंडियन्स जिंकली, पण प्रतिक्रिया देत सूर्यकुमार म्हणाला

**मुंबई:** मोहालीच्या बिंद्रा स्टेडियममध्ये मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात बुधवारी रंगतदार सामना झाला. पंजाब किंग्जने मुंबईला विजयासाठी २१५ धावांचं तगडं आव्हान दिलं होतं. परंतु, मुंबईच्या पलटणमध्ये धडाकेबाज फलंदाजांची मांदीयाळी असल्याने या सामन्यात मुंबईने पंजाबचा ६ विकेट्स राखून पराभव केला. सूर्यकुमार यादवने पुन्हा एकदा जलवा दाखवून मैदानात धावांचा पाऊस पाडला. सूर्यकुमारने ३१ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीनं ६६ धावा कुटल्या. पण त्याला हा सामना फिनिश करता आला नाही. अशातच सूर्यकुमारने माध्यमांशी बोलताना मोठी प्रतिक्रिया दिली आहे.

सूर्यकुमार यादव म्हणाला, या सामन्यात मुंबई इंडियन्सला विजय मिळाल्याने मला खूप आनंद झाला. परंतु, मी हा सामना फिनिश करायला हवा होता. जेव्हा मी फलंदाजीसाठी मैदानात उतरलो तेव्हा पॉजिटिव्ह माइंडसेटने फलंदाजी करणं गरजेचं होतं. मला ईशान किशनला सपोर्ट करायचा होता. कारण तो खूप चांगली फलंदाजी करत होता. मी नेहमीच अशा परिस्थितीत खेळण्यासाठी तयारी करत असतो. माझे सर्व प्लॅन क्लियर असतात आणि जेव्हा मी फलंदाजीसाठी जातो त्यावेळी मी स्वभाविक गेम खेळण्याचा प्रयत्न करतो. माझ्याकडे पॉवर गेम नाही.

# २० गाड्या रद्द, ट्रेनच्या विलंबाची समस्या डिसेंबरपर्यंत कायम राहणार

प्रतिनिधी ४ मे



**गोंदिया :** गेल्या दोन महिन्यांपासून हावडा-मुंबई मार्गावरील पॅसेंजर गाड्यांचे वेळापत्रक पूर्णपणे विस्कळीत झाले असून त्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. डिसेंबर अखेरपर्यंत ही समस्या अशीच राहणार असल्याचे रेल्वे विभागाचे म्हणणे आहे. याचे कारणही रेल्वे विभागाने दिले आहे.

गुरुवारपासून अनेक गाड्यांची चाके थांबणार आहेत. खरे तर, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे रायपूर रेल्वे विभागाच्या रायपूर-रायपूर आरव्ही ब्लॉक हट दरम्यान दुसरा रेल्वे मार्ग आणि रायपूर यार्डच्या आधुनिकीकरणाचे काम ४ ते १० मे दरम्यान प्रस्तावित आहे.

यासाठी २० गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, तर ६५ गाड्या वळवलेल्या मार्गावर चालवण्यात येणार आहेत. देशातील विविध ऊर्जा प्रकल्पांमध्ये कोळशाचा पुरेसा साठा नाही. ज्याचा वीज निर्मितीवर परिणाम होत आहे. त्यासाठी मालगाड्यांद्वारे वीज केंद्रांपर्यंत कोळसा पोहोचवण्याचे काम सुरू झाले आहे. यासाठी प्राधान्याने मालगाड्या सोडण्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

वीज प्रकल्पातील कोळशाचा साठा पावसापूर्वी पूर्ण न झाल्यास भविष्यात देशात वीज संकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे प्रवासी गाड्यांऐवजी मालगाड्यांना प्राधान्य दिले जात आहे. तसेच हावडा-मुंबई मार्गावरील नागपूर ते डोंगरगड दरम्यानच्या तिसऱ्या मार्गाचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे गेल्या दोन-तीन महिन्यांपासून गाड्या उशिराने धावत आहेत.

हावडा-मुंबई मार्गावरील नागपूर ते डोंगरगड दरम्यान सर्व एक्स्प्रेस आणि मेल गाड्यांची वेळ विस्कळीत झाली आहे. गाड्या तीन ते चार तास उशिराने धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांचेही हाल होत आहेत. नियोजित ठिकाणी पोहोचण्यास उशीर होण्याबरोबरच आर्थिक नुकसानही होत आहे. ही समस्या डिसेंबर २०२३ पर्यंत कायम राहणार असल्याचे खासदार सुनील मेंढे यांनी सांगितले.

नागपूरहून गोंदियाकडे येणारी रेलगाडी ढाकणी रेल्वे चौकीजवळ आणि डोंगरगडहून गोंदियाकडे येणारी गुदमा स्टेशनजवळ दीड ते दोन तास उभी केली जात आहे. परिणामी प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वेळेवर न पोहोचल्याने प्रवाशांना त्यांची दुसरी जोड ट्रेन ही पकडता येत नाही. गेल्या तीन-चार महिन्यांपासून ही समस्या कायम असून पुढील सहा महिने ही समस्या कायम राहणार असल्याचे संकेत रेल्वे विभागाने दिले आहेत.

**रद्द केलेल्या गाड्या**

बिलासपूर-रायपूर मेमू स्पेशल, रायपूर-डोंगरगड मेमू स्पेशल, दुर्ग-रायपूर मेमू स्पेशल, रायपूर-दुर्ग मेमू स्पेशल, दुर्ग-रायपूर मेमू स्पेशल, डोंगरगड-रायपूर मेमू स्पेशल, रायपूर-दुर्ग-रायपूर मेमू स्पेशल, बिलासपूर-रायपूर आणि रायपूर-डोंगरगड मेमू स्पेशल, गोंदिया-रायपूर मेमू स्पेशल, बिलासपूर-रायपूर मेमू स्पेशल, टिटलागड-रायपूर मेमू स्पेशल, रायपूर-टिटलागड मेमू स्पेशल, विशाखापट्टणम-दुर्ग एक्स्प्रेस, दुर्ग-विशाखापट्टणम एक्स्प्रेस, रायपूर-जुनागड रोड पॅसेंजर स्पेशल जुनागड रोड-रायपूर पॅसेंजर स्पेशल या गाड्यांना ४ मे ते १० मे पर्यंत रद्द करण्यात आले आहे.

# चंदन तस्करांची आंतरजिल्हा टोळी अकोल्यात जेरबंद




**अकोला:** येथील स्थानिक गुन्हे शाखेने जोरदार कारवाई करीत आंतरजिल्हा चंदन तस्कर टोळीचे पितळ उघडे पाडले असून या प्रकरणी एकूण पाच आरोपीला जेरबंद करण्यात आले. यातील आरोपीकडून १ लाख ५० हजारांचे चंदन जप्त करण्यात आले.

चंदनाचे झाड चोरीला केल्याचा गुन्हा सिव्हिल लाईन्स पोलिस स्टेशनमध्ये दाखल होता. यातील आरोपी नरेश राजाराम वानखडे (वय ३७) रा. ग्राम सिरोळे सेक्टर १, नेरूल जि. ठाणे ह.मु कोळगाव ता. मालेगाव जि. वाशीम, विकास उर्फ विक्की तात्याराव खडसे (वय २२), अकोला, तात्याराव सदाशिव खडसे (वय ६५ वर्ष) रा. कृषी नगर, अकोला ४) सुशांत उर्फ बबलू दादाराव खडसे (वय २२) रा. उमरा लहाण ता. जि. वाशीम आणि रितेश उर्फ बाब्या मधूकर थोरात (वय ३२) रा. कृषी नगर अकोला यांनी चंदनाच्या झाडाची चोरी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यांनी आरोपींना ताब्यात घेवून विचापूस केली असता त्यांनी सिव्हिल लाईन्स पोलिस स्टेशनच्या हद्दीतील वन्य विभागाचे अधिकारी यांच्या निवासस्थानातील एक चंदनाचे झाड, आकाशवाणी केंद्र अकोला परिसरातील एक चंदनाचे झाड तसेच अमरावती पोलिस आयुक्तांच्या हद्दीतील गाडगे नगर पोलिस परिसरातील पोलिस अधीक्षक निवासस्थानात एक चंदनाचे झाड खोडापासून कापून चोरी केल्याची कबूल दिली.

आरोपींकडून एकूण ५० किलो चंदनाचे लाकडाचे तुकडे ज्याची बाजारभावाप्रमाणे किंमत अंदाजे एक लाख ५० हजार आहे,

**पाच जणांना अटक ; दीड लाखांचे चंदन जप्त**

ते जप्त करण्यात आले. आरोपी व जप्त मुद्देमाल पोलिस स्टेशन सिव्हील लाईन्स यांचेकडे पुढील कार्यवाही देण्यात आले आहे.

ही कार्यवाही पोलिस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलिस अधीक्षक मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष महल्ले, पोलिस निरीक्षक महेश गावंडे, उपनिरीक्षक गोपाल जाधव, उप.नि गोपीलाल मावळे, एएसआय दशरथ बोरकर, प्रमोद डोईफोडे, भास्कर धोत्रे, गोकुळ चव्हाण, लिलाधर खंडारे, अन्सार अहेमद, सतिष पवार व शेख नफिज, अनिल राठोड यांनी केली.

# नऊ लाखांचा गुटखा पकडला



**अकोला:** जुने शहर पोलिस स्टेशनच्या हद्दीत जुने शहर पोलिसांनी प्रतिबंधित तंबाखूजन्य सुगंधित गुटखा सुपारी आणि बोलेरो व्हॅन, दुचाकी असा एकूण नऊ लाख रुपयांचा मुद्देमाल आरोपींकडून जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपी नीरज कीर्तीवार रा. काळा मारुती मंदिराजवळ जुने शहर, आरोपी वाजिद अहमद जहूर अहमद राहणार जुनी चावडी बाळापूर तसेच फरार आरोपी गुलशन मनोहरलाल दुलानी राहणार सिंधी कॅम्प यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप घुगे, अप्पर पोलिस अधीक्षक मोनिका राऊत, सचिन गुंजाळ, उपविभागीय पोलिस अधिकारी दुधगावकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक सेवानंद वानखडे, सहायक पोलिस निरीक्षक संगीता रंधे, पोलिस उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक गणेश चोपडे, ए. एस. आय. गजानन खंडारे, पप्पू ठाकूर, विनोद चोरपगार, शैला खंडारे, श्याम पोधाडे, सनी सुरवाडे, अर्जुन खंडारे यांनी केली. शहरात या कारवाईमुळे गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले.

# तस्करांना बेड्या:वाघाची कातडीची तस्करी प्रकरणी चौघांना अटक, १ नग वाघाची कातडी, २० नखे जप्त



**शहादा:** वाघाची कातडीची तस्करी करणारी चौघांच्या टोळीला शहादा पोलिसांनी २९ रोजी रात्री साडेदहा वाजता अटक केली आहे. गुजरात राज्यातून वाघाची कातडी, नखे विक्री होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यानूसार शहादा बसस्टँड २९ रोजी रात्री १०.३० वाजता रामचंद्र गोविंदा जाधव (वय ४० वर्ष, रा. मोराने, ता. सटाणा जि. नाशिक), रामा सायसिंग उमरे (वय २५ वर्ष, रा. चिपी, ता. सटाणा जि. नाशिक), सुखीराम महारु भदाणे (वय ४५ वर्ष, रा. बांधारपाडा, ता. साक्री जि. धुळे), चंदन शमनलाल डेटवाणी (वय २७ वर्ष रा. शहादा जि. नंदुरबार) यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून वन्यप्राणी वाघाची कातडी १ नग, वाघाची नखे २० नग जप्त करण्यात आले आहेत.

त्यांच्या विरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना शहादा कोर्टात हजर केले असता दिनांक ४ मेपर्यंत वन कोठडी मिळाली. नंदुरबार उपवनसंरक्षक कृष्णा भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई केली.

# सावधान..! 'मोचा' चक्रीवादळाचे संकट घोंगावतेय, अवकाळीचा मुक्कामही वाढला

**नागपूर :** यंदाच्या वर्षातील पहिले चक्रीवादळ मे महिन्यात येण्याची शक्यता असून सहा मे रोजी ते धडकण्याची शक्यता आहे. दक्षिण-पूर्व बंगालच्या उपसागरात मोसमी पावसाच्या तयारीच्या हालचाली वाढल्या आहेत. त्याठिकाणी कमी दाबाचा पट्टा तयार होत असून येत्या ४८ तासात त्याचे चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. आंतरराष्ट्रीय हवामानतज्ज्ञांनी मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात तर भारतीय हवामान खात्याने याच आठवड्यात चक्रीवादळाची शक्यता वर्तवली आहे.

दोन मे पासून बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होताना दिसून आला. तो आता तयार झाला असून येत्या ४८ तासात म्हणजे सहा मेपर्यंत त्याचे चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे. शुक्रवारी रात्रीपासून वायव्य भारतावर ताजा पश्चिमी चक्रवात तयार होत आहे. तर सहा मे रोजी चक्रीवादळ तयार होत आहे. या दोन प्रक्रिया एकाचवेळी होत असल्याने कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन वाऱ्याचा वेग वाढणार आहे. त्यामुळे अवकाळी पाऊस थांबेल असे वाटत असतानाच देशभरात पुन्हा अवकाळी पावसाचा प्रवास सुरू होत आहे. त्यामुळे वादळीवाऱ्यासह पावसाची देखील शक्यता आहे.

या परिस्थितीत वाऱ्याचा वेग ५० पेक्षाही अधिक राहू शकतो. बहूतांश भागात गारपीट होण्याची शक्यता आहे. उत्तर भारतात पश्चिमी चक्रवात आणि बंगालच्या उपसागरातून बाष्पयुक्त वाऱ्याचा प्रभाव महाराष्टावर असल्याने सहा मे पर्यंत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भात अवकाळी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

# विभागीय लोकशाही दिन ८ मे रोजी

**अमरावती:** दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने दि. ८ मे, २०२३ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी शासकीय विभागाशी निगडित तक्रारी, गाऱ्हाणी इत्यादी संदर्भातील प्रकरणे, निवेदन लेखी स्वरुपात सादर करावे. नागरिकांनी त्यांच्या तक्रारी पोस्टाद्वारे, dcgamravati@gmail.com किंवा dcg_amravati@rediffmail.com या ई-मेल पत्त्यावर तात्काळ किंवा व्यक्तीश: विभागीय आयुक्त कार्यालयात हजर राहावे, असे विभागीय उपआयुक्त यांनी कळविले आहे.

# वाडेगाव ग्रा.पं. प्रभाग क्रमांक ४ चा पोटनिवडणूक कार्यक्रम

**अकोला:** वाडेगाव ता. बाळापूर येथील प्रभाग क्रमांक ४ अनुसूचित जाती रिक्त पदाचा पोटनिवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने आज जाहीर केला आहे.तो याप्रमाणे- निवडणूकीची सुचना प्रसिद्ध करणे- गुरुवार दि.४ मे २०२३. नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ सोमवार दि.१५ ते गुरुवार दि.१८ मे सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेपर्यंत. नामनिर्देशन पत्र छाननी – शुक्रवार दि.१९ सकाळी ११ वाजेपासून छाननी संपेपर्यंत. नामनिर्देशनपत्र मागे घेणे- सोमवार दि.२२ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत. चिन्ह वाटप व अंतिम उमेदवारी यादी प्रसिद्ध करणे- सोमवार दि.२२ रोजी दुपारी ३ नंतर., आवश्यकता भासल्यास मतदानाचा दिनांक रविवार दि.४ जून २०२३ सकाळी साडेसात ते सायं.साडेपाच पर्यंत , मतमोजणी व निकाल घोषित करणे- सोमवार दि.५ जून २०२३, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणूक निकालाची अधिसुचना प्रसिद्ध करणे- गुरुवार दि.८ जून २०२३.

# विजाच्या कडकडाटासह पावसाची शक्यता; सावधानतेचा इशारा

**अकोला:** प्रादेशिक मौसम विभाग नागपुरद्वारे प्राप्त संदेशानुसार दि. ३ ते दि.७ पर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत सावधानतेचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. जिल्ह्यातिल शेतकऱ्यांनी आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. बाजार समितीत असणाऱ्या शेतमालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. वीज व गारांपासून बचाव करण्यासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. वादळाच्या स्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. जनावरांनाही सुरक्षित निवारा द्यावा. सावधानता तसेच खबरदारी बाळगावी,असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# शुक्रवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

**बुलडाणा:** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र शुक्रवार, दि. ५ मे २०२३ रोजी तपासणीच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे.

जिल्हा रुग्णालयात शुक्रवारी मतिमंद, मनोरूग्ण, कान, नाक, घसा व नेत्रसंबंधित दिव्यांग बोर्ड सुरू असते. मात्र शुक्रवार, दि. ५ मे २०२३ रोजी बुद्ध पौर्णिमानिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे या दिवसाचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

# नागपुरात पावसामुळे कच्च्या विटांची माती, २५ लाखांची हानी

प्रतिनिधी ४ मे



**नागपूर :** अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांसोबत यंदा शहराच्या सीमावर्ती भागात व्यवसाय करणाऱ्या विटभट्टी मालकांनाही फटका बसला असून कच्च्या विटांची पाण्यामुळे माती झाल्याने सुमारे २५ लाख रुपयांची हानी झाल्याचा दावा त्यांनी केला आहे.

नागपुरात पुनापूर, पारडी या भागात मोठ्या प्रमाणात विटभट्ट्यांचा व्यवसाय चालतो. साधारणपणे या भागात ५० ते ६० भट्ट्या असून सुमारे दीडशेवर अधिक मजूर काम करतात. मागील काही दिवसांपासून अवकाळी पाऊस व वादळाचा या व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. मंगळवारी झालेल्या पावसाच्या पाण्यामुळे कच्च्या विटांची माती झाली आहे. त्यामुळे त्यावर झालेला सर्व खर्च पाण्यात गेला आहे. वादळामुळे भट्टीतील राखही उडून गेल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. उन्हाळ्यात घर व इतरही बांधकामांना वेग येतो. त्यासाठी लागणाऱ्या विटांचा पुरवठा करणारे व्यावसायिक या हंगामासाठी वर्षभर तयारी करतात. यंदा मार्च महिन्यापासूनच कमी अधिक प्रमाणात पाऊस पडतो आहे. पूर्ण एप्रिल आणि आता मेच्या सुरुवातीला मुसळधार पाऊस पडतो आहे. त्यामुळे विक्रेत्यांचा हंगामच संकटात सापडला आहे. पारडी व पुनापूर भागात मोकळ्या जागेत पाणी साचते. पाण्याचे लोंढे भट्टीत शिरल्याने तेथे असलेल्या कच्च्या विटा वाहून गेल्याचे कुंभार सेवा समाज पंच समितीचे राजीव खरे यांनी सांगितले. शासनाने या व्यावसायिकांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## वाशीमच्या केंद्रीय विद्यालयाच्या...

# जागेचा प्रस्ताव अडकला 'मंत्रालयात'!

***तीन वेळा बदलली जागा * एक वेळा निधी परत * दुसऱ्यांदा परत जाण्याच्या मार्गावर * दरानुसार रक्कम भरण्याचे पत्र**

● अतिष देशमुख @ वाशीम ●

केंद्रीय व राज्यशासनाच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी केंद्रीय विद्यालयात शिक्षण देण्यात येते. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी असलेल्या केंद्रीय विद्यालयांच्या जागेचा प्रश्न शासकीय अधिकारी सोडवू शकले नाही. तर ते इतरांचे प्रश्न काय सोडविणार असा सवाल निर्माण होणार आहे. जिल्ह्यात केंद्रीय विद्यालय येवून ७ वर्ष झाले अद्यापही जागा मिळाली नाही. तीन वेळा जागा बदलली, एक वेळा ३० कोटीचा आलेला निधी परत गेला, तर दुसऱ्यांदा आलेला २६ कोटीचा निधी परत जाण्याच्या मार्गावर आहे. कारण जागेचा प्रश्न हा मंत्रालयाच्या लाल फितीत वित्त विभागात अडकला आहे.

जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय स्तरावरचे शिक्षण मिळावे या हेतूने २०१७ ला केंद्रीय विद्यालय वाशीम येथे सुरू झाले. कर्मचाऱ्यांच्या मुलांबरोबरच ५ टक्के इतरही मुले या विद्यालयात शिक्षण घेत आहेत. केंद्रीय विद्यालय हे ७ वर्षापासून आरटीओ कार्यालय व डायटच्या जुन्या मोडक्या तोडक्या सुविधा नसलेल्या इमारतीत सुरू आहे. या केंद्रीय विद्यालयाच्या इमारतीच्या जागेसाठी ७ वर्षापासून शोधाशोध सुरू आहे तीन वेळा जागा बदलली आहे. शेवटी विमान तळाजवळील जागा निश्चित करण्यात आली. इमारतीसाठी सुरूवातीला केंद्राकडून ३० कोटीचा निधी मंजुर करण्यात आला. मात्र अधिकाऱ्यांच्या नाकर्ते पणामुळे हा निधी परत गेला. पुन्हा



विमान तळ्याजवळील व पोलिस मुख्यालयाच्या मैदानासमोरील जागेचा प्रश्न लाल फितीत अडकला. कारण केंद्राच्या शाळेसाठी राज्यशासनाने मंत्रालयातून एक पत्र काढून शासकीय दरानुसार रक्कम भरण्याचे आदेश दिले. इतर जिल्ह्यात मात्र शासनाने केंद्रीय



### ५ वर्षापासून इमारतीचे बांधकाम रखडले

७ वर्षापूर्वी वाशीम येथे केंद्रीय विद्यालय सुरू झाले. ४ वर्षापूर्वी बांधकामाचा निधीही आला होता. मात्र जागे अभावी हा निधी परत गेला. अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अद्यापही जागेचे कागदपत्र पुर्ण झाले नाही. तीन वेळा जागा बदलली, आता शासनाच्या विद्यालयासाठी शासनच शासकीय दरानुसार रक्कम मागत असल्याने पुन्हा आलेला निधी परत जाण्याच्या मार्गावर आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शाळेच्या इमारतीचे काम शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे ५ वर्षापासून रखडलेले आहे. यावरून आपले अधिकारी व कर्मचारी किती तत्पर आहेत हे सिध्द होते.

विद्यालयासाठी मोफत जागा उपलब्ध करून दिली. मात्र वाशीमसाठीच वेगळे निकस का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

कारण केंद्रीय विद्यालयाच्या इमारतीसाठी पुन्हा दुसऱ्यांदा २६ कोटीचा निधी उपलब्ध झाला आहे. मात्र जागेचाच प्रस्ताव लाल फितीत मंत्रालयात अटकल्याने हा निधी पुन्हा परत जाण्याच्या मार्गावर आहे. जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्याचे ९० टक्के विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या विद्यालयाची अवस्था ही आहे. तर इतर ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या शिक्षणाची अवस्था काय असेल हे यावरून स्पष्ट होते.

जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्व:ताच्या मुलांच्या भवितव्याची चिंता नाही, तर इतरांच्या मुलांच्या भवितव्याची ते काय चिंता करणार हे यावरून स्पष्ट होत आहे. अगोदरच आकांक्षीत जिल्ह्याच्या यादीत असलेला वाशीम जिल्हा भ्रष्टाचाराने पोखरला असून येथील अनेक प्रकल्प राजकीय उदासिनतेमुळे व अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट वृत्तीमुळे रखडले आहेत.

---

## थोडक्यात

### आश्रमशाळा सुरू करण्याचा आदेश

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड तालुक्यातील मोठेगाव येथील आदिवासी विकास बहुद्देशीय शिक्षण संस्थेला ग्राम मोठेगाव येथे आश्रमशाळा सुरू करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत . याबाबत अधिक माहिती अशी की , मोठेगाव येथे दोन संस्थांमार्फत सन १९९६-९७मध्ये नवीन आश्रमशाळा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता . त्यात आदिवासी विकास बहुद्देशीय शिक्षण संस्थेचाही समावेश होता . दरम्यान , स्थानिक संस्थेला डावलून दुसऱ्या संस्थेला मोठेगाव येथे आश्रमशाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली . त्यामुळे आदिवासी विकास बहुउद्देशीय संस्थेचे सचिव दत्तराव धांडे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली . दरम्यान , या प्रकरणावर सुनावणी देताना उच्च न्यायालयाने व्हीजेएनटी , एसबीसी आणि ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी मोठेगाव येथे वर्ग १ ली ते १० वीपर्यंत आश्रमशाळा सुरू करण्यास मान्यता दर्शवून शासनास निर्देश दिले आहेत . यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे . संस्थेच्या वतीने अॅड . एस . डी . चांडे यांनी बाजू मांडली.

### अवकाळी पाऊस व गारपिटीने २६७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**सर्वाधिक नुकसान कारंजा तालुक्यात**

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

जिल्ह्यात ०२ मे रोजी पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे २६७.३० हेक्टरवरील शेत पिकांचे नुकसान झाले. सर्वाधिक नुकसान कारंजा तालुक्यात झाले आहे. या तालुक्यात १४०.२० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.०२ मे रोजी जिल्ह्यात सरासरी ४२.७ मिलिमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली.

अवकाळी पाऊस व गारपिटीने वाशिम तालुक्यात ५७.३० हेक्टरवरील पेरू, भाजीपाला, मुंग, कांदा, ज्वारी पिकाचे, रिसोड तालुक्यात ५८ हेक्टरमधील भाजीपाला व कांदा, मालेगाव तालुक्यात ११.८० हेक्टरमधील मुंग व कांदा, कारंजा तालुक्यात १४०.२० हेक्टरमधील भाजीपाला, मुंग, कांदा, भूईमुग, गहु, ज्वारी, निंबू, केळी, संत्रा, तीळ या शेतपीकाचे नुकसान झाल्याची व मौजे शेवती येथील दोन विहिरी खचल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे.

### वनोजात रोखला नियोजित बालविवाह

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील वनोजा येथे २ मे रोजी होणारा नियोजित बालविवाह रोखण्यात जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड लाईनला यश आले. वनोजा येथील अल्पवयीन १६ वर्षाच्या बालिकेचा बालविवाह जिल्हा महिला बाल विकास अधिकारी बाळासाहेब सूर्यवंशी यांच्या सतर्कतेने रोखण्यात आला. बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती चाईल्ड लाईन यांच्याकडून जिल्हा बाल संरक्षण कक्ष वाशिमला मिळताच कक्षाच्या बाल संरक्षण अधिकारी लक्ष्मी काळे, क्षेत्रीय कार्यकर्ता रामेश्वर वाळले, चाईल्ड लाईनचे समन्वयक शाहीद खान, सदस्य गोपाल आरु व अविनाश सोनुने यांच्याशी संपर्क साधून नियोजित बालविवाह रोखण्याची कार्यवाही करण्यात आली. या पथकाने रिसोड पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्सटेबल श्री. पठाण, ग्रामसेवक तथा बालविवाह प्रतिबंधक अधिकारी श्री. शिंदे, गाव बाल संरक्षण समितीचे अध्यक्ष तथा सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व ग्राम बाल संरक्षण समितीच्या मदतीने अल्पवयीन बालिकेच्या वडिलांसह कुटुंबीयांचे समुपदेशन करून बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत हमीपत्र लिहून घेण्यात आले. यापुढे अशाप्रकारचा कोणताही बालविवाह जिल्ह्यात होत असल्याचे लक्षात आल्यास चाईल्ड लाईनच्या १०९८ या टोल फ्री क्रमांकावर नागरिकांनी संपर्क साधावा.

---

## खा. भावनाताई गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त वाशीम व मंगरूळपीर येथे...

# दिव्यांगांच्या कृत्रीम अवयवासाठी नोंदणी शिबिर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

दिव्यांगाच्या सशक्ती करण्यासाठी सामाजिक न्याय विभाग व भारत सरकार यांच्या एडीप योजनेअंतर्गत खा. भावनाताई गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त वाशीम-यवतमाळ मतदार संघातील दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रीम अवयव साहित्य वितरण करण्यासाठी २ मे रोजी जि.प. माध्यमिक शाळा वाशीम व ३ मे रोजी जि.प. शाळा मंगरूळपीर येथे नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात दिव्यांगांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देवून नाव नोंदणी केली आहे.

खा.भावनाताई गवळी ह्या आपल्या




वाढ दिवसानिमित्त नेहमीच समाजोपयोगी ऊपक्रम राबविण्याची परंपरा पाळत आहेत. यावर्षी सूध्दा ही परंपरा कायम ठेवित आपल्या मतदार संघातील दिव्यांग व्यक्तीसाठी काहीतरी भारीव सहकार्य करून त्या व्यक्तीना सन्मान मिळावा असा मानस ठेऊन या व्यक्तीना पावलोपावली ज्या दिव्यातून जावे लागते, त्याची धग कमी करण्यासाठी समाजातील सर्वचं घटकांची समज आणी समजूत वाढविण्यासाठी या प्रर्यत्नांचाच एक

### उत्स्फूर्त प्रतिसाद , हजारो दिव्यांगाची नोंदणी



भाग म्हणून दिव्यांग व्यक्तीना दैनंदिनी जिवणात ऊपयोगी पडणारे साहित्य वाटपाचा कार्यक्रम ताईनी हाती घेतला आहे. दिव्यांग बांधवांना समाजात समावून घेण्यासाठी समान संधी आणी हक्काचे संरक्षण मिळावे त्या सोबतच सहाय्य, सोयी, सूविधा, लाभ मिळावा जेणे करून दिव्यांग व्यक्ती देखील एक सर्वसामान्या प्रमाणे आनंदाने जिवन जगू शकेल. म्हणून या ऊपक्रमाचे वाशीम व मंगरूळपीर येथील जि.प. शाळेत करण्यात आले होते.







---

## जि.प.सभापती मापारी यांनी केला सेवानिवृत्त एएसआय जमधाडे यांचा सत्कार



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम पोलिस विभागात प्रदिर्घ सेवा दिल्यानंतर तसेच जिल्हयातील विविध पोलिस स्टेशनमध्ये उत्कृष्ट कार्य करून सेवा निवृत्त झालेले सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक माधव भिकाजी जमधाडे यांचा जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती तथा शिवसेना माजी जिल्हाप्रमुख सुरेश मापारी व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी भावपुर्ण सत्कार केला.

स्थानिक जिजाऊ निवासस्थान येथे झालेल्या सत्कार कार्यक्रमाला जि.प. सभापती सुरेश मापारी, उपशहर प्रमुख नामदेवराव हजारे, कॅप्टन प्रशांत मानोरा, आसेगांव, कारंजा, जऊळका व सुर्वे, पंचायत समिती सभापती बालाजी वानखेडे, शहर प्रमुख गजानन भांदुर्गे, अशोक शिराळ, राजाभैय्या पवार, सावके आदीसह शिवसैनिकांची उपस्थिती होती. सहाय्यक पोलिस निरिक्षक पदावरून सेवा निवृत्त झालेले माधव जमघाडे हे सिव्हील लाईन अकोला येथे पोलिस शिपाई म्हणून प्रथम रुजू झाले.

त्यानंतर त्यांनी वाशिम जिल्हयातील वाशिम येथील पोलिस स्टेशनमध्ये सेवा दिली. वाशिम शहरातील सर्वाधिक क्राईम असलेल्या पंचशिल नगर , अल्लाडा प्लाट, खामगाव जिन या बीट त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या. पोलिस शिपाई, पोलिस नायक, पोलिस हवालदार व सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक अशा पदान्नत्या घेवून तसेच ३० वर्ष प्रदिर्घ सेवा देवून ते सेवानिवृत्त झाले. अनेक गुन्हयांचा चांगला तपास केल्याने आरोपींना शिक्षा सुध्दा झाली. त्यांच्या या सेवा निवृत्ती निमित्त शिवसेनेच्यावतीने जमधाडे यांचा भावपुर्ण सत्कार करण्यात आला.

---

## पळसखेडा येथील पशुवैद्यकिय दवाखाना 'रामभरोसे'!










● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

***अधिकारी व कर्मचारी गैरहजर**
***हलगर्जीपणाने म्हैस दगावली**
***इतर जनावरांचीही प्रकृती चिंताजनक**
***औषंधीची कमतरता, शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड**
***वरिष्ठांचे दुर्लक्ष, पशुपालक आक्रमक**

पळसखेडा येथील पशुवैद्यकिय दवाखाना हा रामभरोसे सुरू आहे. अनेक दिवसापासून परिसरातील जनावरे अज्ञात आजाराने ग्रासले. त्यांनी पळसखेडा येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात धाव घेतली.परंतु कर्तव्यावर असलेले वैद्यकिय अधिकारी आणि कर्मचारी गैरहजर होते. अधिकारी व कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे म्हैशीचा मृत्यू झाला आहे. इतर जनावरांचीही प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

एक म्हैस अशा काही जनावरांची प्रकृती अचानक खराब होवुन ही जनावरे अस्वस्थ असल्याची हिवरा पेन येथील नागरिक देशमुख यांच्या लक्षात आले पळसखेडा येथील पशुवैद्यकिय दवाखाना गाठला. तिथे गेल्यानंतर कार्यालयाला कुलूप आणि कर्तव्यावर असलेले अधिकारी, कर्मचारी गैरहजर दिसलेत. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दामु इंगोले यांनी पळसखेडा येथील पशुवैद्यकीय रूग्णालयात धाव घेतली. यांनी संबंधित डॉक्टरांना फोन करून ही गंभीर बाब निदर्शनास आणुन दिली. एक म्हैस दगावली असून आता इतर जनावरांचीही प्रकृती चिंताजनक आहे.

या नुकसानीला पशुवैद्यकिय अधिकारी व कर्मचारीच जबाबदार असल्याचा आरोप दामुअण्णा इंगोले यांनी केला आहे.वरिष्ठांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरूद्ध कठोर कारवाई करून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा दिला.

---

## पॅरा कमांडो शहिद अमोल गोरे यांचे...

# सोनखास येथे उभारणार भव्य स्मारक !

***स्मारकासाठी १० लाख रूपयाचा निधी**
*** जि.प.च्या सभेत सर्वानुमते ठराव मंजुर**
*** बांधकाम सभापती सुरेश मापारी यांचा पुढाकार**



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

भारत-चिन सिमेवरील अरुणाचल प्रदेशातील अत्यंत कठीण अशा कमेंग व्हॅली आहे. भागात देशाच्या रक्षणार्थ तैनात असलेले जिल्हयाचे सुपुत्र पॅरा रेजीमेंट कमांडो शहीद अमोल गोरे यांना आपल्या दोन साथीदारांचे प्राण वाचवितांना रेस्क्यू ऑपरेशन दरम्यान वीर मरण आले. त्यांची विरगाथा सर्वांना स्मरणात राहावी यासाठी त्यांचे सोनखास येथे स्मारक उभारण्याचा ठराव जि.प. बांधकाम समितीच्या समेत पारीत करण्यात आला.

जि. प. अर्थ व बांधकाम सभापती सुरेश मापारी यांनी पुढाकार घेवुन मांडलेला ठराव समेमध्ये सर्वानुमते मंजुर करण्यात आला. या स्मारकासाठी १० लक्ष रुपयाचा निधी देण्यात येणार जि. प. बांधकाम समितीच्या समेला दिलीप देशमुख, दत्ता पाटिल तुरक, सरस्वतीताई मोहन चौधरी यांच्यासह समिती सदस्य उपस्थीत होते. भारतीय सैन्य दलामध्ये शत्रु सैन्यासोबत लढतांना अत्यंत कठीण ऑपरेशनमध्ये पॅरा रेजीमेंट चे कमांडो सहभागी होत असतात. पॅरा कमांडो पाणी आकाश तसेच जमीनीवर शत्रु सैन्यासोबत लढा देण्यासाठी व त्यांना धुळ चारण्यासाठी तत्पर असतात. अशा कठिण पॅरा रेजीमेंट मधील कमांडो शहीद अमोल यांचे विरमरण शहीद स्मारकामुळे सदैव स्मरणात राहील अशा भावना सभेमध्ये व्यक्त करण्यात आल्या.

### शहिद अमोल गोरे यांच्या कुटुंबासाठी सुरेश मापारी यांनी केली १ लाखाची मदत

शहिद अमोल गोरे यांचे सोनखास येथे स्मारक उभारण्यासाठी जिल्हा परिषदमधून १० लाखाचा निधी मंजुर करण्यात आला. तर शहिद अमोल गोरे यांच्या कुटुंबासाठी बांधकाम सभापती सुरेश मापारी यांनी स्वतः रोख १ लाख रूपयाची मदत केली. यावेळी त्यांच्यासोबत शिवसैनिक व गोरे परिवारातील सर्वसदस्य उपस्थित होते

### अमोल गोरे यांचे विरमरण चिरकाल लक्षात राहणारे- सुरेश मापारी

स्वतःचा जीव धोक्यात टाकुन दोन जवानांचे प्राण वाचविणारे शहीद अमोल गोरे यांचे विरमरण चिरकाल स्मरणात राहणारे असुन सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. तरुणांसह सर्वांना त्यांची विरगाथा स्मरणात रहावी यासाठी सोनखास येथे शहीद स्मारक उभारणार असल्याचे जि.प. सभापती सुरेश मापारी यांनी सांगितले.

---

## हळद व कांदा बी उत्पादक शेतकरी आडचणीत

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**भूमिपुत्र चे मुख्यमंत्र्यांना निवेदन**



विदर्भ- मराठवाड्यातील वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी सह अनेक जिल्ह्यात मोठ्याप्रमाणावर हळद व कांदा बियाण्याचे पीक घेतले जाते. उन्हाळ्यात घेतले जाणारे हे पीक अत्यंत खर्चिक आणि विमा संरक्षणातुन वगळण्यात आलेली मसला पीके आहेत.

गेल्या एक महिन्यापासून सुरू आसलेल्या सततच्या पावसाने हळद उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. उकडून वाळत टाकलेल्या हळदी जागेवर सडत आहेत. एक महीना कडक उन आसल्याशिवाय उकडलेली हळद वाळत नाही. सतत सुरू आसणार्या पावसाने हळद पीक हातात येवुनही सडत आहे. तर कांदा बियाणे उत्पादक शेतकऱ्यांची प्रचंड दुर्दशा होत आहे. शेतातुन काढून आनलेले कांदा बियाणे उन्हा अभावी सडुन जात आहे. एकरी लाख रुपयांपर्यंत उत्पादन खर्च येणारी आणि किमान एकरी निव्वळ एक लाख रुपयांपर्यंत नगदी उत्पन्न देणारी हि पीक आहेत. विदर्भ-मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांचे मुख्य पीक आसणार्या हळद व कांदा बी उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने वाऱ्यावर सोडले आहे. सरकारने हळद उत्पादक आणि कांदा बी उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तात्कळ पंचनामे करून मदत देण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथराव शिंदे आणि राज्याचे कृषी मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या कडे निवेदना व्दारे केली आसल्याचे भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी केली आहे.

# जन्मशताब्दी महोत्सव : अण्णासाहेबांचे कार्य कधीही विसरता येणार नाही – हर्षवर्धन देशमुख

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** सहकारमहर्षी कै. डॉ. वा. रा. उपाख्य अण्णासाहेब कोरपे यांचे 'योगदान एका क्षेत्रात किंवा एका समाजासाठी नसून, सर्वांसाठी आणि सर्वच क्षेत्रांत त्यांचे भरीव योगदान असल्याने अण्णासाहेब हे संपूर्ण महाराष्ट्रासाठीच दैवत असलेले व्यक्तिमत्त्व असल्याचे प्रतिपादन माजी कृषीमंत्री तथा शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी बुधवारी येथे आयोजित कार्यक्रमात केले.

कापूस उत्पादक चळवळीचे प्रणेते, अकोला, वाशिम जिल्हा बँकेच्या प्रगतीचे शिल्पकार अण्णासाहेब कोरपे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मुख्य कचेरीच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये महादेवराव भुईभार, माजी मंत्री अझहर हसेन, गुलाबराव गावंडे, डॉ. डी. एम. भांडे, सुभाषराव ठाकरे, आमदार अमित झनक, आ. किरण सरनाईक, माजी आ. वसंतराव खोटरे, तुकाराम बीरकड, हरिदास भदे, बबनराव चौधरी, नारायणराव गव्हाणकर, गजानन दाळू गुरुजी, जिल्हा बँकेचे अध्यक्ष संतोषदादा कोरपे, उपाध्यक्ष श्रीधरराव कानकीरड, संचालक रमेश हिंगनकर, वामनराव देशमुख, शिरीष धोत्रे, प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष उपस्थित रमेश हिंगनकर यांनी केले, तर आभार सुभाष कोरपे यांनी मानले.

### अकोला जिल्हा बँक राज्यात अव्वलस्थानी

◆अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शिल्पकार अण्णासाहेब कोरपे यांनी ज्याप्रमाणे ही बँक सांभाळली. त्याच आत्मीयतेने बँकेला एका वेगळ्या शिखरावर नेण्याचे कार्य अध्यक्ष संतोषदादा कोरपे करीत असल्यानेच ही बँक राज्यात अव्वलस्थानी आहे. महिलेच्या कपाळावरील कुंकू दिसते मात्र ते कुंकु टिकवून ठेवण्याचे कार्य जे मेन करते, ते कुणाला दिसत ताही. अशाच प्रकारे संतोषदादा यांचे कार्य मनासारखे असल्याचे मत माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे यांनी व्यक्त केले.

# शेगावातील 'आनंदसागर' मधील आध्यात्मिक केंद्र भाविकांसाठी सुरू

■ शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानची माहिती

प्रतिनिधी ४ मे

**शेगाव (बुलढाणा) :** श्री गजानन महाराज संस्थानद्वारे संचालित आनंदसागर मधील आध्यात्मिक केंद्राचा काही भाग सुरू केला आहे. यासंदर्भात श्री गजानन महाराज संस्थानने परिसरात अधिकृत सूचनाफलक लावले आहेत. या आध्यात्मिक केंद्रात भाविकांना प्रवेश सेवार्थ निःशुल्क असून, सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजतापर्यंत सुरू राहणार आहे. सायंकाळी ४ वाजता प्रवेश बंद करण्यात येणार आहे. शासन निर्देशानुसार कोविड काळामध्ये काही अपवाद वगळता गत दोन वर्षे 'श्रीं'चे मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद होते. या बंद काळात निश्रीभाती श्री संस्थेने सर्त ताथाती उपक्रम व नियोजित अत्यावश्यक विकासकामे थांबविली होती.

श्री संस्थेच्या विश्वस्त मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार सर्व सेवाकार्याचा प्राधान्यक्रम ठरविलेला आहे. परिस्थिती पूर्वपदावर आल्यावर, आर्थिक घडी नीट भक्तांमध्ये आनंद 'आनंदसागर



मधील आध्यात्मिक केंद्राचा काही भाग भाविकांसाठी खुला करण्यात आला असून, निःशुल्क प्रवेश आहे. त्यामुळे भाविकांना आनंद झाला आहे. भाविकांसह शहरवासीयांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. सेवाधाऱ्यांची सेवा व पर्याप्त मुबलक पाणी उपलब्ध झाल्यावर आध्यात्मिक केंद्राची देखभाल-दुरुस्ती, काही भागांचे पुनर्निर्माण व पुढील विकास कार्ये हाती घेण्यात येतील, असे शेगाव संस्थानचे सेवाधारी व्यवस्थापकीय विश्वस्त यांनी सूचना फलकाद्वारे कळविले आहे

# जिल्ह्यातील जडवाहतुकीला जबाबदार कोण?

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** शहरात व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जडवाहतुक सुरु आहे. निर्धारीत क्षमतेपेक्षा अधिक मालवाहतुक सुरु असून याकडे उपप्रादेशिक परिवहन विभागाचे अर्थात आर टी ओ चे दूर्लक्ष आहे. त्यामुळे जिल्ह्यातील रस्त्यावर अपघात वाढले आहे.

अकोला वाशिम मार्गावर मोठ्या प्रमाणात अवैध वाहतुक असून त्याच बरोबर ओव्हर लोडेड ट्रक रस्ता तर खराब करतच आहे त्याच बरोबर इतर वाहतुक प्रभावित करत आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या कामात ओव्हर लोडेड ट्रक चालत असून त्यावर आर टी ओ कुठलीही कारवाई केल्याची माहिती मिळाली नाही. जिल्ह्यातील या अवैध व ओव्हरलोड वाहतुकीवर कारवाईस अभय का असा प्रश्न

क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतुक उघडकीस



विचारला जात आहे. या ओव्हरलोड व अवैध वाहतुकीमुळे जिल्ह्यातील अपघातात वाढ होत असून या विरोधात आर टी ओ काही मोहिम उघडणार आहे की नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ओव्हर लोड ट्रक वाहतुकीचा आढावा घेण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# अन्न व औषध प्रशासन विभागाचे दूर्लक्ष

प्रतिनिधी ४ मे

अकोला शहरात मोठ्या प्रमाणात कॅनद्वारे शुध्द पाण्याचे दूकाने अनेकांनी थाटली आहे. पण, यापैकी किती कॅनधारकांकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र आहे आणि किती कॅन चालक शुध्दतेची दक्षता घेतात याची तपासणी होते की नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

शुध्द पाण्याच्या नावाखाली पाण्याची सर्रास विक्री अकोल्यात सुरु आहे. पण, शुध्द पाण्याचा दावा करणाऱ्या कॅनद्वारे शुध्द पाण्याचा पुरवठा होतो की नाही याची तपासणी कोण करत आहे अशी विचारणा नागरिकांकडून होत आहे. पाण्याच्या शुध्दतेची खात्री ग्राहकांनी कशी काय ओळखावी असा प्रश्न विचारला जात आहे. तर दूसरीकडे अन्न व



### कॅन च्या शुध्द पाण्याची तपासणी कुठे

औषध प्रशासन विभाग कुठे ही तपासणी करत नसल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, हा सर्व प्रकार थेट नागरिकांच्या आरोग्याशी खेळणारा आहे. रोज वितरीत होणारे लाखो लिटर पाणी हे कुठल्याही तपासणी शिवाय विकले जात असून याकडे महापालिकेचे देखील दूर्लक्ष आहे. अनेक कॅन चालक थेट महापालिकेचे पाणी कॅन मध्ये भरत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्याचा शोध महापालिका जलप्रदाय विभाग घेईल काय अशी विचारणा स्थानिकांद्वारे होत आहे.

# ईद मिलन सोहळा संपन्न



प्रतिनिधी ४ मे

**मोरझाडी :** येथे समस्त गांव करी मंडळी मोरझाडी आणी जमातअत ए. इसलामी हिंद हातरूनच्या वतीने मोरझाडी येथे समाजात ऐकोपाची भावना निर्माण व्हावी सण व संस्कृति बद्दल आदर व सम्मान असावा या उद्देशाने मोरझाडी येथे ईद मिलन सोहळ्याचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून नौशाद उसमान औरंगाबाद हे होते.

यावेळी मोरझाडी येथील सरपंच व उपसरपंच व श्रीकृष्ण महाराज आढाऊ आणि सुधाकर मोरखडे प्रामुख्याने कार्यक्रमाला उपस्थित होते. सर्व जातीपंथातील लोक या कार्यक्रमाला आवर्जून यांचा सहभाग होता. या कार्यक्रमातील विशेष म्हणजे शीरखुर्माचा सर्व मोरझाडी येथील लोकांनी आनंद घेतला. या कार्यक्रमाला हातरुन येथील प्रमुख उपस्थिती प्रमुख उपस्थिति अहफाज खान, वाजीद खान, वाजीद खान, रइस खान यांची उपस्थती होती. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सैय्यद नदीम यांनी केले.


# अतिक्रमण निर्मुलन कर्मचाऱ्यांचे दूर्लक्ष

■ शहरात सर्वत्र अतिक्रमणाचा सुळसुळाट

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** शहरातील प्रमुख मार्गावर अतिक्रमणाचा विळखा असून महापालिकेचे अतिक्रमण पथक सकाळी फोटो काढल्यानंतर गप्पात व्यस्त असल्याचे चित्र आहे. कुठे ही अतिक्रमण काढताना हे पथक दिसत नाही. त्यामुळे या पथकाचे काम तरी काय असा प्रश्न उपस्थित होतो.

अकोला महापालिका हद्दीत केवळ शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण नाही. तर शहरातील लहान मोठ्या रस्त्यावर पण अतिक्रमण आहे. शहरात नियमित अतिक्रमण साफ करण्याची जबाबदारी अतिक्रमण विरोधी



पथकाची आहे. हे पथक शहरातील प्रमुख रस्त्यांचे सकाळी फोटो काढते आणि ते मोबाईलवर अपलोड केले की मग या पथकाची गाडी केवळ शहरात फेरफटका मारते. एका ठिकाणी उभी करत कर्मचारी गप्पा करण्यात व्यस्त असतात. अकोला शहरातील नागरिक नियमित टॅक्स देत असताना त्या टॅक्सपेअरसाठी महापालिका आयुक्त व प्रशासक काय सोयी निर्माण करत आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरातील मुख्य चौकातील अतिक्रमण साफ होत नाही तर महापालिका हे मनुष्य पालन केंद्र आहे का असा प्रश्न नागरिकांनी केला आहे.

# महावितरणच्या संचालक (वाणिज्य) पदी योगेश गडकरी

प्रतिनिधी ४ मे

**मुंबई :** महावितरणचे संचालक (वाणिज्य) म्हणून योगेश गडकरी यांची सरळसेवा भरतीद्वारे निवड झाली आहे. आज त्यांनी संचालक (वाणिज्य) या पदाचा पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी श्री. योगेश गडकरी हे कार्यकारी संचालक (देयके व महसूल) म्हणून कार्यरत होते.



नागपूर येथील मूळचे रहिवासी असलेले श्री. योगेश गडकरी यांनी अमरावती येथून अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. (कॉम्पूटर इंजिनिअरिंग) केले आहे. एप्रिल १९९४ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वर्धा येथे रुजू झाले. त्यांनी मुंबई मुख्यालयात विविध पदावर काम केले आहे. त्यांची पदोन्नतीद्वारे कार्यकारी संचालक (देयके व महसूल) या पदावर नियुक्ती करण्यात आली. श्री. गडकरी यांचा वीज क्षेत्रातील अतिशय अभ्यासू अधिकारी म्हणून ➤ पान २ वर

# मुंडगाव जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढली प्रभात फेरी

प्रतिनिधी ४ मे

**अकोट :** अकोट तालुक्यातील मुंडगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी शाळेत पटसंख्या वाढविण्यासाठी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली.व पहिल्या वर्गात प्रवेश नोंदवा यासाठी सदर प्रभात फेरी काढण्यात आली.यासाठी अकोट गट साधन केंद्र अधिकारी तेलगोटे ,माजी शिक्षण विस्तार अधिकारी शेख अमीर शेख चांद याच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात येऊन या प्रभात फेरीसाठी मुंडगाव येथील




जिल्हा परिषद शाळांच्या व उर्दू शाळेतील विद्यार्थींनी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता.कु वंदना गारोडी,निशा देवगिरे,अजय ढोले,कु.सिमा केवटी,कु.मिनल रडक,विजय सावरकर, अफजल खान,एजाज अली,अबरार शहा,मोहम्मद एजाज,अफजल शहा,जाकीर हुसेन,आसिफ खान,सै.नुसरत अली यांच्यासह असंख्य विद्यार्थी , शिक्षक व पालक उपस्थित होते.

# कांदा उत्पादक शेतकरी उतरला थेट रस्त्यावर

■ शेतकऱ्यांना त्वरीत मदत देण्याची केली मागणी




प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** राज्य सरकारच्या ढिसाळ धोरण्याच्या विरोधात व अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आज काँग्रेसने पातुर येथे आंदोलन केले. या आंदोलनात कांद्याच्या माळा घालून आंदोलन करण्यात आले. तर खराब झालेला कांदा अधिकाऱ्यांना भेट देण्यात आला.

गेल्या महिन्याभरात अकोला जिल्ह्यातील पातूर येथे गारपीट आणि वादळंमुळे रब्बी पिके जमीनदोस्त झालीय..कांदा , अंबा , लिंबूसह अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.नुकसानीची मदत सरकारने द्यावी करीता आज पातूर येथे काँग्रेस कडून तहसील कार्यालयावर मोर्चा कडण्यात आला होता. या मोर्चात शेकडोच्या संख्येने शेतकरी सामील झाले होते. विशेषतः कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळावे या मागणीसाठी तहसीलदार यांना खराब कांदे भेट देण्यात आले. तर आंदोलकांनी कांद्या हार घालूनच मोर्चा सहभागी घेतला.शेतकऱ्यांना त्वरीत मदत घोषित करण्याची मागणी आंदोलन कर्त्यांनी केली आहे. अद्याप काही भागात पंचनामे झाले नसून ते केव्हा होणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे पंचनामे अद्याप बाकी

■ पातूर व बार्शिटाकळीचे शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत

प्रतिनिधी ४ मे


**अकोला :** अवकाळी पावसामूळ राज्यातील शेतकरी संकटात सापडला आहे, त्यात अकोला जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचं लाखोंचं नुकसान झालेय. मागील मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचं मोठं नुकसान झालंय. तर गारपीटीमुळे जिल्ह्यातील पातुर आणि बार्शीटाकळी तालुक्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचं लाखोंचं नुकसान झालंय.

दोन दिवस पूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे बार्शीटाकळी तालुक्यातील वाघझळी गावातील कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झालाय. संतोष चिंचोळकर आणि मारुती व्यवहारे या शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचलं होतं. या पावसामुळे काढणीला आलेला कांदा वाहून गेला. तर काढलेला कांदा म्हणजेच कांद्याचे ढिगारे पाण्याखाली गेल्यानं पूर्ण कांदा नष्ट झाला. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान चे पंचनामे अद्याप कृषी विभागाने न केल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या घटने मधील संतोष चिंचोळकर या शेतकऱ्याचं अवकाळी पावसामुळे लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे. पत्नीचा सोनं गहाण ठेवून पैसा जमावला तसेच इतर ठिकाणी कर्ज घेऊन कांद्याची ➤ पान २ वर

## सिटी न्यूज सुपरफास्ट रंग भरा बक्षीस मिळवा... सिटी न्यूज सुपरफास्ट

१





विद्यार्थ्याचे पुर्ण नाव : ---------------------------------------------
वर्ग व शाळेचे पुर्ण नाव: ---------------------------------------------
घराचा पत्ता : ---------------------------------------------
पालकाचा मोबाईल क्रमांक---------------------------------------------



( सिटी न्यूज सुपरफास्ट केवळ शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पुढील तीस दिवस रंगभरा व बक्षीस मिळवा हे अभियान उन्हाळ्याच्या सुट्टीत राबवित आहे. या तीस दिवसांच्या दोन्ही ड्राईग पैकी वीस दिवसांचे दोन्ही ड्राईग पुर्ण भरणाऱ्या विद्यार्थ्यांना रंगविलेले चित्र सिटी न्यूज सुपरफास्ट तिसरा मजला, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला. येथे जमा करावे लागतील. यातील उत्कृष्ट पध्दतीने रंगविलेल्या चित्राची निवड करत चित्र रंगविणाऱ्या विद्यार्थ्याला सिटी न्यूज सुपरफास्ट बक्षीस देणार आहे. नियम, अटी व शर्थी लागू. )

है दैनिक प्रकाशक, मालक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ● मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ● संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK